
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २६६
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, १४ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## फटाक्याच्या कारखान्यात स्फोट, आठ कामगार ठार



**अनकापल्ली :** आंध्र प्रदेशमधील अनकापल्ली जिल्ह्यात रविवारी (दि.१३) एका फटाक्याच्या कारखान्याला लागलेल्या आगीत आठ कामगारांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिलांचाही समावेश आहे. या घटनेत आणखी सात जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोन कामगारांची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि राज्याच्या गृहमंत्री व्ही. अनिता यांच्याशी फोनवरून बोलून दुर्घटनेची माहिती घेतली तसेच चौकशीचे आदेश दिले आहेत. याबाबत गृहमंत्री व्ही. अनिता यांनी सांगितले की, अनकापल्ली जिल्ह्यातील कैलासपट्टणम येथील फटाके उत्पादन कारखान्यात दुपारी १२.४५च्या सुमारास स्फोट झाला. आगीत दोन महिलांसह एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अंतरंग
सलग सुट्ट्यांमुळे मुरूड किनारी पर्यटकांची गर्दी/२
‘सुधा सितारा शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी संजीवनी’/५
पायोनियर प्रीमिअर लीगमध्ये पँथर्स संघ विजेता/८

# शेतकर्‍यांना १२ तास मोफत वीज

## मुख्यमंत्र्यांची घोषणा; २०२६अखेर होणार कार्यवाही

**वर्धा : प्रतिनिधी**

डिसेंबर २०२६पर्यंत राज्यातील ८० टक्के शेतकर्‍यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करून देण्यात येणार आहे तसेच येत्या पाच वर्षात राज्यात सामान्य नागरिकांचे वीज बील दरवर्षी कमी होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १३) आर्वी येथे केले.

वर्ध्यातील आर्वी येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पणासह ७२० कोटींच्या विकासकामांचे ई-लोकार्पण व भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार अमर काळे, आमदार सर्वश्री दादाराव केचे, सुमित वानखेडे, समीर कुणावर, राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान कार्यक्रमास उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाने शेतकर्‍यांच्या हिताचे विविध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली आहे. शेतीसाठी १२ तास विजेची शेतकर्‍यांची मागणी होती. या दृष्टीने राज्य शासनाने प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून डिसेंबर २०२६पर्यंत ८० टक्के शेतकर्‍यांना ३६५ दिवस दिवसाला १२ तास मोफत वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्य शासनाने २०२५ ते २०३०पर्यंत राज्यातील वीज वापरकर्त्यांचे वीज बील दरवर्षी कमी करण्याचे नियोजन व तशी कार्यवाही सुरू केली आहे तसेच ३०० युनिटपर्यंत वीज वापरणार्‍या मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# सेवेची हमी देण्यात पनवेल मनपा अग्रेसर -आमदार प्रशांत ठाकूर



**■ विविध विकासकामांचा शुभारंभ**
**■ रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायमच ई-गव्हर्नर्सला प्रोत्साहन दिले आहे. त्या दृष्टीने इज ऑफ डूइंग बिझनेसला चालना देण्यासाठी पनवेल कनेक्ट अ‍ॅपच्या माध्यमातून येथील महापालिका नागरिकांना विविध सुविधा ऑनलाईन देत आहे. सेवेची हमी देण्याच्या दृष्टीने महापालिकेने अग्रेसर राहून उत्तम पाऊल उचलले, सेवा केंद्र उभारली, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. १३) येथे काढले.

पनवेल महापालिकेच्या वतीने लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात पनवेल कनेक्ट अ‍ॅप, स्वच्छता विभागाकडील गाड्यांचे लोकार्पण, माहिती प्रसारण डिजिटल बोर्डचे अनावरण, महा-ई-सेवा हमी केंद्र तसेच भव्य रोजगार मेळाव्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून महापालिका ही कार्यक्षेत्रातील प्रत्येकाला आपली वाटली पाहिजे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याबद्दल महापालिकेचे व आयुक्तांचे त्यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमास महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक-नगरसेविका, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, श्रीराम पवार, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी महापालिका पारदर्शक, लोकाभिमुख, गतिमान प्रशासन करण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करीत आहे, असे सांगितले. याचबरोबर सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच ई गव्हनर्सच्या दृष्टीने मनपाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. यासाठी महापालिकेने महा ई-सेवा केंद्र सुरू केली आहेत तसेच नागरिकांच्या प्रत्येक अर्जाची दखल घेऊन त्यावर ताबडतोब उपाययोजना करण्यासाठी महापालिकेने पनवेल कनेक्ट अ‍ॅप लॉन्च केले आहे. या अ‍ॅपच्या माध्यमातून नागरिक व मनपा यांच्यामध्ये सुसंवाद साधला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शासनाने दिलेल्या १०० दिवसीय कृती आराखड्यांतर्गत सात कलमी कार्यक्रमांवर आधारित विविध योजनांचे या कार्यक्रमात उद्घाटन करण्यात आले.

प्रास्ताविकात कैलास गावडे यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. उपस्थितांचे आभार अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी मानले.

निषकेन फाऊंडेशनचे किरण रहाणे, दीपक पवार व अमोल उंडे यांच्या सहकार्यातून महापालिकेने या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते.

# यशवंत हायस्कूलच्या इमारतीचे लोकार्पण आणि माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

## सातारा काशीळ येथील सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती





**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा तालुक्यातील काशीळ येथील यशवंत हायस्कूलच्या जीर्णोद्धारीत इमारतीचा लोकार्पण सोहळा आणि माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन रविवारी (दि. १३) संस्थेचे सचिव विकास देशमुख, संघटक डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

उद्योजक अविनाश भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास ॐ दत्त परिवाराचे निनादानंद महाराज, वक्ते इंद्रजित देशमुख, संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, बंडू पवार, विभागीय अधिकारी नवनाथ जगदाळे, सरपंच अर्चना कोरे, मुख्याध्यापक दीपक महापरळे, माजी विद्यार्थी भरत माने, सुरेश माने, नितीन माने, मंगेश माने, अशोक पवार, संजय जाधव अविनाश जाधव, लक्ष्मण माने, हेमंत माने आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## ‘त्या’ हुल्लडबाज मुलांवर गुन्हा दाखल

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील प्रसिद्ध सिंहगड किल्ल्यावर पर्यटनासाठी आलेल्या न्यूझीलंडमधील पर्यटकाला मराठीतून शिव्या देण्यास भाग पाडणार्‍या हुल्लडबाज चार तरुणांवर पुणे ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कार्ल रॉक असे या पर्यटकाचे नाव असून त्याने ल्युक द एक्सप्लोरर या त्याच्या युट्यूब वाहिनीवर हा व्हिडीओ अपलोड केला होता. या ब्लॉगमधील संतापजनक प्रकाराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून अनेकांनी हुल्लडबाजारांबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करीत आहेत.




**पनवेल : करंजाडे नोडमध्ये दोन एकर जागेत भव्य आणि सोयीसुविधांनी युक्त असे उद्यान उभारले जाणार आहे. या कामाचे भूमिपूजन शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. (वृत्त पान ३ वर..)**

## नराधम विशाल गवळीची तळोजा कारागृहात आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

कल्याणमध्ये १३ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणारा नराधम विशाल गवळी याने आत्महत्या केली आहे. गवळीला तळोजा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते. त्याने रविवारी (दि. १३) पहाटे चार ते पाचच्या दरम्यान तुरूंगातील शौचालयात गळफास लावून जीवनयात्रा संपवल्याची माहिती समोर आली आहे.

कल्याणमध्ये एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली होती. डिसेंबर २०२४मध्ये घडलेल्या या गुन्ह्याप्रकरणी आरोपी विशाल गवळी याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या तसेच त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली होती.






# करंजाडेत साकारणार उद्यान

## आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील करंजाडे नोडमध्ये आता लवकरच २ एकर जागेत एक भव्य आणि सर्व सोयीसुविधांनी युक्त असे उद्यान उभारले जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा शनिवारी पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नातून करंजाडे सेक्टर ३, येथे हे उद्यान साकारले जाणार आहे. या उद्यानाच्या विकासासाठी तब्बल १ कोटी ७४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. भूमिपूजन समारंभाचे आयोजन सेक्टर ३, प्लॉट नंबर १८, त्रिवेणी धाम मंदिराच्या जवळ करण्यात आले होते. या विकासकामांमुळे करंजाडे परिसरातील नागरिकांना एक सुंदर आणि आधुनिक सोयींनी परिपूर्ण उद्यान उपलब्ध होणार आहे. यामुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडेल





आणि नागरिकांना मोकळ्या हवेत विरंगुळ्यासाठी एक उत्तम ठिकाण मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आमदार महेश बालदी हे नेहमीच आपल्या मतदारसंघातील नागरिकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात आणि विकासकामे त्वरित पूर्ण व्हावी यासाठी आग्रही असतात. त्यांचे हे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत आणि त्यामुळे करंजाडे शहर लवकरच एक आदर्श शहर म्हणून ओळखले जाईल.

या भूमिपूजन समारंभावेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, समीर केणी, भाजपचे जिल्हा चिटणीस रूपेश धुमाळ, विनोद सीरवी, महिला अध्यक्षा सुषमा मयेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सिडकोचे जे काही आगामी प्रकल्प आहेत, त्यासाठी आम्ही सतत पाठपुरावा करीत आहेत. करंजाडेवासीयांना सिडकोने दिलेली स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी आपली आहे आणि येत्या काळात ती निश्चितपणे पूर्ण करू.**

**–आमदार महेश बालदी**

# मानसरोवर स्टेशनमध्ये डागडुजी सुरू; उर्वरित समस्याही सोडवण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

हार्बर रेल्वे मार्गावरील मानसरोवर रेल्वे स्थानकात सध्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. स्थानकातील छतावर बसवण्यात आलेले जुने आणि जीर्ण झालेले पत्रे बदलून त्या ठिकाणी नवे पत्रे बसवण्याचे तसेच स्थानक परिसरात रंगरंगोटी करण्याचे काम हाती घेण्यात आले असून, पत्रे बदलण्यात येत असल्याने पाणी गळती होऊन प्रवाशांना पावसाळ्यात होणारा त्रास काहीसा कमी होण्याची शक्यता आहे.




सिडको आणि रेल्वेच्या माध्यमातून मानसरोवर रेल्वे स्थानक विकसित करण्यात आले आहे. २००८ साली उद्घाटन करण्यात आलेल्या या रेल्वे स्थानकामुळे काही मिनिटातच मुंबई तसेच मुंबई उपनगरातील शहर गाठणे शक्य होत असल्याने कामोठे वसाहतीमध्ये घर खरेदी करण्याला पसंती दिली जात आहे. परिणामी कामोठे वसाहतीमधील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून, मानसरोवर रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्यांची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत आहे.

अशातच रेल्वेस्थानकाला खेटूनच प्रधानमंत्री आवास योजनेचे काम सुरू असल्याने स्थानकात जाणारी वाट बिकट झाली आहे. आवास योजनेच्या कामासाठी पूर्वी वाहनतळासाठी वापरात असलेले भूखंड वापरण्यात आल्याने स्थानक परिसरात जागा मिळेल तिथे वाहन उभी केली जात आहेत. यामुळे स्थानकाला वाहनांचा विळखा पडल्याचे पाहायला मिळत आहेत.

स्थानकाच्या आवारात सध्या उपलब्ध असलेल्या वाहनतळात खाद्य पदार्थांची तसेच इतर दुकाने थाटण्यात आली आहेत तसेच रेल्वे स्थानकाच्या बाहेर उपलब्ध असलेल्या सार्वजनिक शौचालयाला लागूनच खाद्यपदार्थ विक्री केली जात असून, शौचालयाच्या काही भागाचा वापर फेरीवाल्यांकडून साहित्य ठेवण्यासाठी केले जात आहे. रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्मवर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे, मात्र या ठिकाणी पाणी साठवण्यासाठी वापरात असलेल्या टाक्यांची सफाई कधी करण्यात आली याची माहितीच टाकीवर टाकण्यात आलेली नाही.



**पनवेल : भाजप युवा मोर्चा शहर कोषाध्यक्ष मयुर कदम यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी अंकुश पाटील, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये कच्छ युवक संघ, पनवेल ग्रामस्थ मंडळ, तक्का आणि युवा प्रतिष्ठान तक्का व अजय बहिरा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ४७ व्या अध्रकरवाला रक्तदान अभियानांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी रक्तदानाचे महत्त्व विशद केले आणि रक्तदात्यांचे कौतुक केले.





या शिबिरावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कामोठे मंडळ अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तक्का विभागीय अध्यक्ष प्रतीक बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, संदीप बहिरा, तुकाराम बहिरा, भानुदास बहिरा, महेश राऊळ, राम सारंग, गोपाल करटगी, संतोष आपशिंगे, महेंद्र सिंह, चेतन शहा, प्रशांत बहिरा, आमरीक सिंग, अतुल बहिरा, रुपेश परदेशी, भारत बहिरा, श्रेयस बहिरा, सचिन चिखलेकर, राहुल वाहूळकर, लोकेश ठाकुर, आफताब ताडे, इस्माईल भाई, समद मुकादम, अभिजित भवर, अंकुश पाटील, मयुर कदम, डॉ. राजेश भाई आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### कर्नाळा येथे कंटेनर कलंडला



**पनवेल :** कर्नाळा अभयारण्य येथे कंटेनर पेण बाजून पनवेलच्या दिशेने येणारा कंटेनर कलंडल्याने काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती. पेण बाजूकडून पनवेल बाजूकडे येणारा (आरजे ०९ जीई ५५७७) कंटेनर केमिकल पावडर होती. कंटेनरवरील चालकाचे कर्नाळा अभयारण्य जवळील एका वळणावर गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कंटेनर कलंडला. याघटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि वाहतूक पोलीस घटनास्थळी पोहचून वाहतूक कोंडी दूर केली.

### खांदा वसाहतीत आढळला मृतदेह

**पनवेल :** खांदा वसाहत परिसरात एका ६० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत. अनोळखी व्यक्तीचे अंदाजे ६० वर्षे असून त्याचा चेहारा उभट, रंग सावळा, अंगाने सडपातळ, दाढी वाढलेली काळी पांढरी, डोक्याचे केस काळे पांढरे वाढलेले, डोळे अर्धवट उघडे, सुमारे उंची पाच फुट, नाक सरळ, तोंड अर्धवट उघडे, दाढी पांढरी काळी बारीक, अंगात लाल पांढरा चेक्सचा फुल शर्ट काळ्या रंगाची पेंन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक बालाजी पवार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वडघर रमाबाईनगरातील प्रबुद्ध बुद्धविहारात महात्मा फुले जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील रमाबाईनगर–वडघर येथे प्रबुद्ध बुद्धविहारात महात्मा जोतिबा फुले यांची १९८ वी जयंती शुक्रवारी (दि. ११) रमाई महिला मंडळाच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी दिवसभरात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महिलांनी सामुदायिक पंचशील वंदनेना सादर केली.



त्यानंतर महिला व लहान मुलांच्या वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी श्वेता पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. वक्तृत्व स्पर्धेत महिला गटात शितल जाधव यांनी क्रमांक पटकावला. तर लहान मुलांच्या गटात प्रथम क्रमांक आदर्श कोरे, द्वितीय क्रमांक मधुर कोरे व तृतीय क्रमांक वंश चितळे याने पटकावला. विजयी स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आली. सायंकाळी लहान मुलांची व महिलांची वेशभूषा स्पर्धा तसेच विविध खेळ घेण्यात आले. सूत्रसंचालन उर्मिला गायकवाड आणि वैशाली कोरे यांनी केले.

कार्यक्रमाला आरपीआयचे पनवेल शहर अध्यक्ष प्रवीण जाधव, सामाजिक कार्यकर्ते सागर कांबळे, माजी ग्रामपंचायत सदस्य भरत सोनवणे यांच्यासह वडघर गावातील मान्यवर व रमाई महिला मंडळाचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवट आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. रमाई महिला मंडळाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल मान्यवरांनी रमाई महिला मंडळाचे कौतुक केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीचे नियोजन

*१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त वडघर येथील प्रबुद्ध बुद्ध विहार परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. बुद्ध विहारासमोर सकाळी ७ वाजता आकर्षक रांगोळी काढण्यात येणार आहे. यासह सकाळी १० वाजता बुद्ध वंदना करून दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता लहान मुले व महिलांसाठी नृत्य स्पर्धेचे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.*





**पनवेल : हनुमान जन्मोत्सवानिमित्त पळस्पे येथील तरुण उत्साही मित्र मंडळातर्फे आयोजित सोहळ्यात पालखी सजविण्यात आली होती. या वेळी भाविकांनी सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने हजेरी लावून जन्मोत्सव साजरा केला.**

# ताडगोळे विक्रीतून स्थानिकांना मिळतोय रोजगार

**उरण : वार्ताहर**

ताडगोळ्याचे सेवन शरीरासाठी लाभदायक असल्याने सध्या फळे खरेदी करण्यासाठी उरण बाजारात नागरिकांची गर्दी असल्याचे विक्रेत्याकडून सांगितले जाते. ताडगोळे फळे चवीला गोड असून यामध्ये व्हिटॅमीन सी, खनिज आणि लोह असल्यामुळे यांच्या सेवनाने रोगप्रतिकारक :शक्ती वाढते.

ताडगोळा हा शरीराला ऊर्जा देणारा, थंडावा देणारा आणी नैसर्गिक पदार्थ असल्यामुळे त्याचे आरोग्यदायी फायदे मोठे आहेत. त्यामुळे ग्राहकांचा कल अधिक प्रमाणात या फळाकडे वाल्तांना दिसत आहेत. उरण बाजारात राजपाल नाकाजवळील एच.बी.पटेल जनरल स्टोअर्स जवळ, गांधी चौक, गांधी चौक, सी टी झान हायस्कूल चौक, आनंद नगर आदी ठिकाणी ताडगोळे विकावयास आले आहेत.

बाजारात ताडगोळे विक्रीसाठी येऊ लागले आहेत. यासाठी ग्राहकांना प्रति डझन १५० रुपये दर आकारला जात आहे. साधारणपणे प्रति डझन १०० रुपये किंवा त्यापेक्षा कमी दरात मिळणाऱ्या ताडगोळ्यांच्या दारात वाढ झाल्याने नागरिकांनी खरेदी करतांना हात आखडता घेतला आहे, मात्र आवक वाढल्यानंतर दरात घट होईल, अशी माहिती ताडगोळे विक्रेत्यांनी दिली आहे. थंडीची चाहूल लागली आहे. याच काळात रसाळ आणि चविष्ट असे ताडगोळे बाजारात येतात त्याची सुरुवात झाली आहे. याकाळात ताडगोळ्याना मोठ्या प्रमाणात मागणी असते.

उरणच्या समुद्र किनाऱ्यावर ताडांची झाडे आहेत. या झाडांच्या माध्यमातून ताडी व ताडगोळे यांची विक्री केली जाते, मात्र सध्या या परिसरातील ताडांच्या झाडांची संख्या घटली आहे. तर या उंच झाडांवर चढून ताडगोळे काढणे धोकादायक आणि जिकीरीच काम करणारे उपलब्ध होत नाहीत. आणि उपलब्ध झाले तर त्यांचे दर परवडत नसल्याची माहिती ताडगोळे विक्रेत्यानी दिली





आहे. उन्हाळ्यात बाहेरील वातावरणाने शरीराचे तपमान वाढते हे तापमान कमी करण्यासाठी ताडगोळे हे फळ महत्वाचे काम करते त्यामुळे या फळाला अधिक मागणी आहे.

## संपादकीय

# शिवरायांचा आठवावा प्रताप

हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगडावर झालेला ३४५वा शिवपुण्यतिथी कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास अधोरेखित करणारा ठरला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिवरायांच्या कार्याचा आढावा घेत अनेक पैलूंवर प्रकाश टाकला.

**जेव्हा आपला देश गनिमांच्या अनन्वित अत्याचारांनी हैराण आणि हतबल झाला होता तेव्हा गुलामगिरीचे हे पाश तोडून रयतेला मानमरातब मिळवून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय झाला. जिजाऊ माँसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली शिवरायांनी अठरा पगड जातींचे मावळे गोळा करून स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली आणि जिद्द, दूरदृष्टी, पराक्रम आणि रणनीतीने यशस्वी करून दाखवली. असा हा जाणता राजा महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि अखंड भारताचे प्रेरणास्थान आहे. शिवपुण्यतिथिनिमित्त किल्ले रायगडावर आलेले केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी शिवरायांना अभिवादन केले आणि त्यांनी महती कथन करताना यथोचित गौरव केला. छत्रपती शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवू नका. ते देशाचे; नव्हे तर संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान आणि आदर्श आहेत, अशा शब्दांत ना. शाह यांनी शिवराय हे व्यक्तिमत्व उत्तुंग असल्याचे सांगितले. किल्ले रायगडावर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची निस्सीम श्रद्धा असलेल्या श्री जगदीश्वराचे मनोभावे दर्शन व आशीर्वाद घेत येथील विविध उपक्रमात ते सहभागी झाले होते. राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीस्थळीही मंत्रीमहोदय नतमस्तक झाल्याचे पहायला मिळाले. रायगडावर पालखी सोहळ्यात सहभागी होत त्यांनी शिवरायांची पालखी खांद्यावर घेत पायी वारी केली. आपल्या भाषणात त्यांनी शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना मी आजवर अनेक नायकांची चरित्रे वाचली आहेत, मात्र असे दुर्दम्य साहस मी एकाही जणात पाहिले नाही. त्यांच्यानंतर औरंगजेब आला होता तोपर्यंत छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, ताराराणी, संताजी, धनाजी या सगळ्यांनी लढा दिला आणि औरंग्याची कबर इथेच बांधली गेली याचाही आवर्जून उल्लेख केला. शिवरायांची राजधानी असलेले रायगड हे केवळ पर्यटनस्थळ न राहता ते प्रेरणास्थळ बनावे, अशी अपेक्षा व्यक्त करून आज आपण रायगडावरून संकल्प करीत आहोत की, आपल्या स्वातंत्र्याला १०० वर्षे होतील तेव्हा आपला देश जगात क्रमांक एकवर असेल, असा निर्धारही ना. शाह यांनी व्यक्त केला. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खासदार उदयनराजे भोसले यांनी केलेल्या मागण्यांचा संदर्भ देत अनेक गोष्टी स्पष्ट केल्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारकाचे काम लवकर सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, पण लवकर त्यावर तोडगा निघेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. त्याचप्रमाणे महाराजांचा प्रमाण इतिहास तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. याशिवाय महाराजांच्या १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश व्हावा यासाठी 'युनेस्को'कडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यासाठी युनेस्को परिषदेत सादरीकरण करण्यासाठी ते आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार जाणार असल्याचे सांगितले. एकंदर शिवपुण्यतिथी कार्यक्रमात अनेक गोष्टींना उजाळा मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे अद्वितीय असेच आहे. प्रत्येकाने शिवरायांचे विचार अंगीकारल्यास देश जगात अव्वल होण्यास वेळ लागणार नाही.**

# मानवतावादी महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर



आज पृथ्वीचे वय हे साधरणतः ५ कोटी वर्षे आहे, ह्या कालावधीत अब्जो माणसं जन्माला आली आणि निघून गेली परंतु असे फार काही निवडक महामानव आहेत त्यांचे नाव अजूनही अजरामर आहेत. त्यापैकी एक नाव मोठ्या अभिमानाने भारतीयाचे आहे ते म्हणजे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (सपकाळ).

असे काही महामानव असतात की, त्यांच्या महान कार्यामुळे त्या देशाची ओळख पटते. असेच आपले कुशाग्र बुद्धिमान, कायदे पंडित व उच्च विद्याविभूषित डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्यामुळे विश्वात आपल्या देशाला काही वेगळीच ओळख पटलेली आहे.

कुठल्या देशाची राज्यघटना चांगली असेल तर सर्वात प्रथम अख्या विश्वात प्रथम क्रमांकावर नावं निघत ते म्हणजे आपल्या भारत देशाचं आणि साहजिकच लगेच नावं निघत ते म्हणजे हे महान घटनाकार कोण तर मोठ्या अभिमानाने नावं येत ते म्हणजे भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकरांचे.

ह्या वरील सर्व घटनांचा उल्लेख केल्यावर आपला उर भरून येतो आणि साहजिकच आपल्याला भारतीय म्हणून अभिमान वाटू लागतो. तर ही आपल्या पूर्वजांची कमाई ज्याचा आपल्या सर्व भारतीयांना फार मोठा अभिमान आहे.

आपण खूप भाग्यवान आहोत की ह्या भारतभूमीला एक से एक रत्न प्राप्त झालेले आहेत. तसे बघितले तर भारत ही खऱ्या अर्थाने हिऱ्या रत्नांची खाण आहे. असेच एक रत्न १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशात महू

या लष्करी छावणी असलेल्या गावी रामजी व भीमाबाईंच्या पोटी बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. भीमराव हे रामजी सकपाळ व आई भीमाबाई यांचे १४वे अपत्य होते. बाळाचे नाव भिवा असे ठेवण्यात आले, त्यांची भीम, भीमा व भीमराव ही नावेही प्रचलित झाली. आंबेडकरांचे कुटुंब हे त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबडवे या गावचे होते.तो काळ पारतंत्र्याचा काळ होता व आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. १८९३ साली रामजी सपकाळ सैन्यातून निवृत्त झाले. तेव्हा भीमराव केवळ दोन वर्षांचे होते. भीमराव केवळ सहा वर्षाचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले.

अस्पृश्य असल्यामुळे भीमाला शाळेत इतर विद्यार्थ्यांपासून वेगळं बसवलं जात असे. ते वर्गात एका कोपऱ्यात किंवा वर्गाबाहेर गोणपाटावर बसायचे. हे गोणपाटही त्यांना रोज घरून शाळेत आणावं लागत असे आणि शाळा संपल्यावर घेऊन जावं लागत असे, कारण शाळेतील उच्च जातीय शिपाई त्या गोणपाटाला स्पर्श ही करत नव्हता. तर काही शिक्षकही भीमाकडे फारसं लक्ष सुद्धा देत नसत. तसेच भीमाला तहान लागली तर शाळेतील पाण्याच्या नळाला स्पर्श करायची परवानगी सुद्धा नव्हती. त्यांच्या स्पर्शाने पाणी अशुद्ध होईल असं मानलं जात होतं. शाळेचा शिपाई नळाची तोटी फिरवेपर्यंत भीमाला वाट पाहत थांबावं लागायचं आणि शिपाई जवळपास नसेल तर तहान न भागवताच भीमाला माघारी जावं लागत असे. एकदा एका सार्वजनिक नळावर भीमा शांतपणे पाणी पिताना दिसले तेव्हा स्वतःच्या मर्यादेचं उल्लंघन केल्याबद्दल त्यांना मारहाण सुद्धा झाली होती. इतकी मानखंडना भीमरावांना शाळेत सहन करावी लागत होती.

हे सर्व प्रश्न जेव्हा भीमराव आई, वडील व नातेवाईकांना विचारत तेव्हा ते सुद्धा निरुत्तर होत व भीमराव हे गोंधळलेल्याच परिस्थितीत राहत. किती यातना बालवयात भीमरावांना सहन कराव्या लागल्या असतील. तरी पण भीमरावांनी शिक्षणाची कास सोडली नाही. ते थांबले नाही व उच्च विद्याविभूषित झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे न घाबरणारे, स्पष्ट वक्ते व राष्ट्रभक्त होते. ते इंग्रजांना सुद्धा घाबरत नसत. त्यांना सुद्धा ते धारेवर धरत असत. जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तीन गोलमेज परिषदेत सहभागी झाले होते तेव्हा इंग्रजांची चांगलीच भंबेरी उडाली होती व ते निरुत्तर झाले होते.

सायमन आयोगाच्या अहवालावर प्रतिक्रिया म्हणून ऑगस्ट १९३० मध्ये नागपुरात पहिली अखिल भारतीय बहिष्कृत वर्ग परिषद'' घेण्यात आली. ह्या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्षस्थानी होते. ह्या परिषदेत त्यांनी राष्ट्राच्या भवितव्या विषयी दूरदृष्टीने मांडणी केली आणि काटेकोरपणे चिकित्सक तपशीलही दिला. ब्रिटिशांचा गैरकारभार आणि वासाहतिक राज्यात भारताला आलेले दारिद्र याबद्दल डॉ. आंबेडकरांनी धारदार शब्दात आरोप नोंदविले. ब्रिटिश राजवट भारतात लागू झाल्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षामध्ये पाच दुष्काळ पडले, त्यात सुमारे १० लाख लोकांनी जीव गमावले. त्यानंतर पंचवीस वर्षांमध्ये सहा दुष्काळ पडले, त्यात ५० लाख लोकांचा जीव गेल्याची नोंद आहे आणि त्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांमध्ये काय आढळते? तर या पावशतकात अठरा दुष्काळ पडले आणि त्यातून तब्बल दिड ते अडीच कोटी लोकं मरण पावल्याचा अंदाज आहे. ब्रिटिश राजवटीमुळे भारतात आत्यंतिक गरिबी निर्माण झाल्याचं ते ठामपणे म्हणाले. संपन्न व समतापूर्ण समाज निर्माण करण्यासाठी स्वतंत्र अनिवार्य असल्याच मत त्यांनी व्यक्त केलं होतं.

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी आपल्या देशाला स्वतंत्र मिळालं आणि देशाची राज्यघटना कोण तयार करणार? तर सर्वानुमते व सर्वात प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नावं पुढे आलं. ह्याला कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सखोल अभ्यास, हुशारी, कुशाग्र बुद्धिमत्ता व त्यांच्या अंगी असलेली मानवता हीच होती.

त्यांची नेहमी कणव ही कामगार, शेतकऱ्यांच्या व स्त्रियांच्या बाजूनेच होती. त्यांना नेहमी वाटायचे की सरकार हे कामगारांचे असले पाहिजे कारण त्यांचा संपूर्ण विश्वास होता की देशाची प्रगती ही केवळ कष्टकरी, शेतमजूर , स्त्रिया व कामगार यांच्याच परिश्रमावर अवलंबून असते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची घटना लिहितांना त्यांचा केंद्र बिंदू हा सामान्य माणूस होता. त्याची प्रगती व्हावी हाच उदात्त हेतू होता.सर्व नागरिकांना न्याय मिळवून देणं, हे भारतीय संविधानच एक उद्दिष्ट आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय हे न्यायाचे तीन अत्यावश्यक घटक उद्देशिकेत नमूद केले आहेत. हे तिन्ही घटक परस्पर संबंधित आहेत. त्यांचा मूलभूत आशय समान आहे.

राज्यघटनेत मुलांच्या शिक्षणाची, आरोग्याची व सुरक्षेची योग्य ती काळजी घेतली आहे. घटनेत जसे आपल्याला अधिकार प्राप्त झाले आहेत तसेच कर्तव्य सुद्धा पार पाडावयाची आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे मतदानाचा अधिकार पुरुष आणि स्त्रियांना समान व एकाच वेळी दिला गेला आहे. ह्यासाठी कुठलाही संघर्ष करावा लागला नाही.स्त्रियांना विशेष अधिकार देऊन त्यांच्या उन्नतीसाठी हिंदू कोड बिलाद्वारे त्यांनी जोरदार प्रयत्न केला होता परंतु इतरांनी पाठिंबा न दिल्यामुळे तेव्हा ते शक्य झाले नाही, पण मग त्याचेच १८ कायदे करून आज स्त्रिया स्वाभिमानाने व ताठ मानेने समाजात उभ्या आहेत व प्रगती करत आहेत.महत्वाचे म्हणजे लोकशाहीचा नियम असला तरी तो कोणी सत्ता काबीज करेल त्याला स्वतःला आवडेल त्यानुसार सत्ता वापरायचं स्वतंत्र नसेल याची खातरजमा मार्गदर्शक तत्व करतात हे खूप लोकशाहीसाठी महत्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाकडे पाहिले तर असे दिसून येते की त्यांचे जीवन हे खूपच कष्टमय होते. ते विद्वान होते, बुद्धिमान सुद्धा होते परंतु त्यांना पावलो पावली अपमान सहन करावा लागला. ते एव्हढे हुशार व दूरदृष्टी असलेले नेते असून निवडणुकीतून निवडून येण्यासाठी त्यांना बराच संघर्ष करावा लागला. परंतु ते खचले नाहीत. खऱ्या देशभक्ता प्रमाणे त्यांनी देशाच्या नागरिकांसाठीचे हित साधून घटनेमध्ये सर्वाधिकार मिळवून दिले. कधीही बदल्याची भावना त्यांच्या कडे नव्हती. मानवताच भरलेली होती, हे आपल्या राज्यघटनेतून आपल्याला दरवेळेस प्रतीत होते, हा त्यांचा किती मोठेपणा !

आज भारतात सर्वात जास्त पुतळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेच आहेत. त्यांचे अर्थशास्त्रातील योगदान अतुलनीय आहे. मला अजूनही एक प्रसंग आठवतो जेव्हा सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया समोर पेच प्रसंग आला होता. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शी तत्वांचा आधार घेऊन तो गंभीर प्रश्न सोडविण्यात आला होता.

आजच्याही युगात त्यांचे विचार हे आदर्श व प्रेरणादायी आहेत. संपूर्ण विश्वात त्यांचे नावं आदराने घेतले जाते व त्यांना आदर्श मानले जाते. तसेच त्यांना मानणारे व सन्मान करणारे वाढत आहे कारण की, डॉ. बाबासाहेब हे मानवतावादी आहेत. त्यांच्या जयंती निमित्त महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन.

**–अरविंद मोरे,** नवीन पनवेल



## बदलते तंत्रज्ञान

### व्हाट्सअ‍ॅपवर दिसणारं निळं वर्तुळ नेमकं काय आहे?

तुमच्या मोबाईलमधील व्हॉट्सप, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर हे नवीन निळे वर्तुळ आलेले तुम्ही पाहिलंच असाल पण अनेकांना तर त्याचा उपयोग काय? हेही माहीत नसेल.मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये मोबाईलची भर पडली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. लोकांचा दिवसभरातला जास्तीत जास्त वेळ सोशल मीडियावर स्क्रोलिंग करण्यात जातो. हे ओळखून सोशल मीडिया सेवा देणाऱ्या संस्था ग्राहकांना दर दिवशी नवनवे फीचर्स देत आहे. यात भर पडली आहे मेसेंजरवर दिसणाऱ्या निळ्या वर्तुळाची.




तुमच्या मोबाईलमधील व्हॉट्सप, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर हे नवीन निळे वर्तुळ आलेलं तुम्ही पाहिलंच असाल पण अनेकांना तर त्याचा उपयोग काय? हेही माहीत नसेल. हे निळे वर्तुळ मेटा एआयचे प्रतिनिधित्व करतं, मेटा ने लाँच केलेला हा स्मार्ट असिस्टंट आहे आणि हा फिचर आपण विनामूल्य वापरू शकतो. मेटा एआय दोन महिन्यांपूर्वी लाँच करण्यात आला होता, परंतु फक्त काही देशांमध्ये उपलब्ध होता. पण आता मेटा एआय भारतातही उपलब्ध करण्यात आला आहे.

मेटा एआय हे एक अतिशय प्रगत एआय मॉडेल आहे, जे तुमच्या प्रश्नांची उत्तरं तात्काळ देऊ शकतं. डॉक्युमेंट बनवण्यासाठी मदत करू शकतं आणि भाषांचे भाषांतर देखील करू शकतं. ईमेल लिहिण्यासाठी, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनसाठी, एक्सेल शीट बनवण्यासाठी हे अतिशय उपयुक्त आहे. इंग्रजी शिकण्यापासून ते करिअर मधील प्रगतीपर्यंत सर्व विषयांवर त्याच्याकडून माहिती मिळू शकते. हे एआय मॉडेल LLMA-3 मॉडेलवर आधारित आहे, जे जगातील सर्वात प्रगत भाषा मॉडेलपैकी एक आहे.

मेटा एआयची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे आपण थेट फेसबुक आणि इन्स्टाग्राम फीडवर त्याचा वापर करू शकतो. शिवाय व्हॉट्सपवर आपण जसे चॅटिंग करतो तसंच निळ्या वर्तुळावर क्लिक करून माहिती विचारली तरी पुढच्या सेकंदाला तुम्हाला उचित रिप्लाय मिळतो. जिथे त्याच्याकडे माहितीची कमतरता असेल अशा विषयाबाबत तो नम्रपणे नकार देतो आणि याबद्दल तुमच्याकडे माहिती उपलब्ध असल्यास तुम्ही ती फीड करा असेही सांगतो.

# विनोदी लेखक द.मा. मिरासदार



दत्ताराम मारुती मिरासदार हे मराठीतले साहित्यिक, कथाकथनकार, विनोदी लेखक, पटकथाकार आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष होते. त्यांचे शिक्षण अकलूज, पंढरपूर येथे झाले. पुण्यात आल्यावर ते एम्.ए. झाले. काही वर्षे पत्रकारीता केल्यानंतर त्यांनी इ.स. १९५२ साली अध्यापनक्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कँप एज्युकेशनच्या शाळेत ते शिक्षक होते. इ.स. १९६१ मध्ये ते मराठीचे प्राध्यापक झाले.

व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि द. मा. मिरासदार ही त्रयी १९६२ सालापासून महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात कथाकथने करीत असत. कथाकथनाचे तीनहजारांहून अधिक कार्यक्रम केल्याने या त्रयीच्या कार्यक्रमात परिपक्वता जाणवत असे. द. मा. मिरासदार ध्वनीक्षेपकासमोर उभे राहून हातवारे करीत बोलू लागले की, श्रोत्यांना एक अद्भुत नाट्य अनुभवायला मिळे. मिरासदारांच्या कथाकथनाचे कार्यक्रम महाराष्ट्राबाहेरही कलकत्ता, इंदूर, हैदराबादसारख्या शहरांतून कार्यक्रम झाले. त्याचप्रमाणे त्यांनी कॅनडा–अमेरिकेतल्या २३ गावांतून २५ कार्यक्रम करायचा विक्रमही केला होता. कथाकथनाखेरीज त्यांची विनोदी भाषणेही गाजत असत.

### निमित्त

द. मा. मिरासदार यांच्या कथाकथनाचे कार्यक्रम वाईच्या वसंत व्याख्यानमालेत आणि वाई प्राज्ञपाठशाळेच्या सरस्वती उत्सवामध्ये अनेकदा झाले आहेत.


मराठीतील श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी, चिं.वि. जोशी, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे यांनी जोपासलेली विनोदी लेखनाची परंपरा द. मा. मिरासदारानी पुढे सुरू ठेवली. मिरासदारांच्या व्यंकूची शिकवणी, माझ्या बापाची पेंड, शिवाजीचे हस्ताक्षर, भुताचा जन्म, माझी पहिली चोरी, हरवल्याचा शोध इत्यादी कथा उत्कृष्ट लिखाण आणि त्याचे इत्तम सादरीकरण यामुळे वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या मनात कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. गप्पागोष्टी, गुदगुल्या, मिरासदारी, गप्पांगण, ताजवा, असे २४ कथासंग्रह, १८ विनोदी चित्रपटांच्या पटकथा त्यांच्या नावावर आहेत. 'एक डाव भुताचा' या चित्रपटात कथा–पटकथा लेखनासह हेडमास्तरची भूमिकाही त्यांनी केली होती. मिरासदारांच्या लेखनात अस्सल विनोदी अशी अनेक गावरान पात्रे आढळतात. त्यात नाना चेंगट, गणा मास्तर, रामा खरात, बाबू पैलवान, सुताराची चहाटळ आनशी, ज्ञानू वाघमोडे, अशी एकाहून एक अस्सल इब्लीस, बेरकी, वाह्यात, टारगट आणि क्वचित भोळसट अशी ही सारी पात्रे आहेत. ती श्रोत्यांना खळाळून हसायला लावत.

त्यांच्या बहुतेक कथा ग्रामीण जीवनावर आहेत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे आणि इरसालपणाचे दर्शन घडवून त्यातील विनोद मिरासदारांनी आपल्या कथांतून फुलवला. असे असले, तरी 'स्पर्श', 'विरंगुळा', 'कोणे एके काळी' सारख्या काही गंभीर कथांतून त्यांनी जीवनातील कारुण्यही प्रत्ययकारीपणे टिपले आहे. तथापि त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती मिस्किल कथा लिहिण्याकडेच आहे.

पुण्यात झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी 'भुताची गोष्ट' ऐकवली. ही गोष्ट दीड तासाहून अधिक काळ रंगली होती.

### बातमीतील बात



## आरोग्य प्रहर



### कॉफीचे पिण्याचे फायदे आणि तोटे...

ऑफिसमध्ये दीर्घ बैठका आणि दीर्घ कामकाजाच्या तासांसाठी कॉफी इंधन म्हणून काम करते. आता कॉफी ही प्रत्येक ऑफिसमधील लोकांची जीवनरेखा बनली आहे. पण ही कॉफी तुमची झोपच हिरावून घेत नाही तर तुमची कोलेस्टेरॉल पातळीही वाढवत आहे.कॉफी बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मशीनमुळे कोलेस्टेरॉलची पातळी वाढत आहे. यामुळे हृदयरोगाचा धोका देखील वाढू शकतो.जर कॉफी गाळली नसेल तर त्यात डायटरपेन्स असतात जे कोलेस्टेरॉल वाढवू शकतात. सहसा ऑफिसमध्ये फिल्टर कॉफी नसते. त्यामुळे ऑफिस मशीनमधून बनवलेली कॉफी पिल्याने कोलेस्टेरॉल वाढण्याचा धोका जास्त असतो.डॉ. अमर सिंघल यांच्या मते, मशीनमधून बनवलेल्या कॉफीमध्ये डायटरपीन्सचे प्रमाण जास्त असते, जे कोलेस्ट्रॉल वाढवते. म्हणूनच ते अधिक नुकसान करते. तर फिल्टर कॉफी तितकी हानिकारक नाही. कोणत्याही प्रकारची कॉफी जास्त प्रमाणात सेवन केल्यास अनेक नुकसान होऊ शकतात.न्यूट्रिशन, मेटाबोलिझम अँड कार्डिओव्हस्कुलर डिसीज मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, डायटरपीनयुक्त कॉफीचे जास्त सेवन केल्याने हृदयरोगाचा धोका वाढू शकतो. तथापि, हे तुम्ही कोणत्या प्रकारची कॉफी पिता यावर अवलंबून असते.जर तुम्ही दिवसभर एस्प्रेसो, फ्रेंच प्रेस किंवा मशीन–ब्रू कॉफी सारखी फिल्टर न केलेली कॉफी प्यायली तर तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी वाढू शकते, ज्यामुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढू शकतो.

साधारणपणे बहुतेक लोक सकाळी कॉफी पिण्याचा सल्ला देतात. कारण १२ ते १४ तास कॉफी पिल्यानंतरही कॅफिन शरीरात राहते आणि मेंदूतील न्यूरॉन्स सक्रिय ठेवते. म्हणून, जास्त कॉफी पिल्याने मेंदूच्या क्रियाकलापांवर परिणाम होऊ शकतो. असे असूनही, कॉफी कधी आणि कशी प्यावी याचे नियोजन करा–परीक्षेपूर्वी रात्री अधूनमधून कॉफी पिणे ठीक आहे, परंतु सामान्य परिस्थितीत, दुपारी ४ नंतर कॉफी पिऊ नये कारण संध्याकाळी कॉफी घेतल्याने रात्रीच्या झोपेवरही परिणाम होतो.

# सुधा सितारा शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी ठरतेय संजीवनी -मंत्री आदिती तटकरे

## सुदर्शन केमिकल्स कंपनीच्या उपक्रमाचा २३५ विद्यार्थ्यांना लाभ




**रोहे : प्रतिनिधी**

आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व हुशार मुलींना दत्तक घेऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज व सुधा सीएसआर फाऊंडेशनचा उपक्रम स्तुत्य आहे. सुदर्शन कंपनीसह येथील कर्मचाऱ्यांनी जपलेले सामाजिक भान कौतुकास्पद आहे. हा उपक्रम आता केवळ 'सुधा सितारा' राहिला नाही, तर खऱ्या अर्थाने 'सुधा सितारे' झाला आहे, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी केले. हुशार व गरजू विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी सुधा सितारा शिष्यवृत्ती संजीवनी ठरत असल्याचेही अदिती तटकरे म्हणाल्या.

सुदर्शन केमिकलच्या वतीने सुधा सीएसआर अंतर्गत मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते रोहा व महाड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील २३५ विद्यार्थ्यांना 'सुधा सितारा' शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यामध्ये १८५ मुली, ४९ मुले व १२ दिव्यांग स्कुलमध्ये आयोजित शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यावेळी सुदर्शन केमिकल्सच्या पीपल्स प्रॅक्टिस हेड शिवालिका पाटील, सुदर्शन रोहा साईट हेड विवेक गर्ग, सीएसआर हेड माधुरी सणस आदी उपस्थित होते.

अदिती तटकरे म्हणाल्या, गुणवत्तेवर आधारित हा उपक्रम आहे. मुलींमधील गुणवत्ता हेरून त्यांना अर्थसहाय्य व प्रोत्साहनपर मार्गदर्शन देण्याची गेल्या पाच वर्षांत जवळपास सहाशे विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे. हा उपक्रम सातत्याने सुरू राहावा. संपूर्ण रायगड जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्याला जातोय, याचा आनंद आहे. यामुळे मुलींचा आत्मविश्वास वाढेल.

यावेळी राजेश राठी यांनी संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टयांना अनुसरून सुधा सीएसआर शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक विकास या क्षेत्रात कार्यरत आहे. या सीएसआर कार्यक्रमातून आजवर लाखो लोकांच्या आयुष्यात बदल घडवण्याचे काम झाले आहे. 'सुधा सितारा' शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थ्यांना व्यक्तिगत मार्गदर्शन, आत्मविश्वास वृद्धी आणि भविष्यातील येणाऱ्या आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्याची क्षमता विकसित केली सुदर्शन कंपनीत 'डायव्हर्सिटी अँड इन्क्लुजन' अंतर्गत उपक्रम राबवले जात आहेत. आपण समाजातही हेच मूल्य रुजवत आहोत. यावेळी सुधा सीएसआर उपक्रमांतर्गत, मुलींप्रमाणेच मुलांना आणि दिव्यांगांना दत्तक घेऊन मदत केली जात आहे. या वर्षीच्या सुधा सितारा उपक्रमाची व्याप्ती संपूर्ण रायगड जिल्ह्यात झाली, याचा आनंद होत असल्याचे

प्रास्ताविकात माधुरी सणस यांनी सामाजिक जाणिवेतून २०१९ मध्ये या उपक्रमाला सुरुवात केली. गेल्या पाच वर्षात शेकडो मुलींना सुधा सितारा शिष्यवृत्ती दिली आहे. गरजू मुलामुलींना शिक्षण आणि मेंटॉरशिप देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी सुदर्शन केमिकल्समधील कर्मचार्यांनी या मुलामुलींचे पालकत्व स्वीकारले आहे.

## कर्जतमधील मधुमेह, रक्तदाब रुग्णांना औषधांचा मोफत पुरवठा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात सार्वजनिक आरोग्य मंत्रालयाच्यावतीने मधुमेह आणि रक्तदाबाचा त्रास असलेल्या रुग्णांना औषधे देण्यात आली. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून तालुक्यात ग्रामीण भागात उच्च रक्तदाबाचे ५८०० तर मधुमेह ३५०० रुग्ण असून या सर्वांना या योजनेतून औषधे दिली जात आहेत. या योजनेचा शुभारंभ कर्जत तालुक्यात नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आला.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उच्च रक्तदाब आणि मधुमेह असलेल्या रुग्णांना औषध पुरवठा असंसर्गिय आजारांवर उपाययोजना म्हणून औषधे दिली जातात. रायगड जिल्हा परिषद हद्दी मधील उच्च रक्तदाब आणि मधुमेह असलेले रुग्णांना देण्यास सुरुवात झाली आहे. कर्जत तालुक्यात उच्च रक्तदाब यांचे ५८०० तर मधुमेह यांचे ३५०० रुग्ण आहेत.

नेरळ प्राथमिक केंद्र परिसरात असलेल्या रुग्णांना औषध कीट देण्याचा कार्यक्रम करण्यात आला. या योजनेच्या शुभारंभ प्रसंगी कर्जत पंचायत समितीचे प्रशासक आणि गटविकास अधिकारी सुशांत पाटील तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. संगीता मेढे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गटविकास अधिकारी पाटील यांनी तालुक्यातील मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे रुग्ण कमी होण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांचे माध्यमातून हा प्रकल्प राबविला जात असल्याची माहिती दिली.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक सुभाष चव्हाण, ,तालुका आरोग्य कार्यालयातील आरोग्य सेवक सुनील चव्हाण, गजेंद्र महाजन, संदीप आव्हाड, योगेश नवाळे, आरोग्य सेविका आणि आशा सेविका या वेळी उपस्थित होत्या.



## भेंडखोल येथील उत्तरमुखी मारुती मंदिराच्या जीर्णोद्धाराचा शुभारंभ



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातीले भेंडखोल येथे हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधत उत्तरमुखी मारुती मंदिराच्या जिर्णोद्वाराच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे श्रीवर्धन तालुकाध्यक्ष, दर्शन भाई विचारे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. संपूर्ण भंडारी समाजाने सध्या रायगड व रत्नागिरी जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सन्माननीय सुनील तटकरे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली एकत्र येत विकासाच्या दिशेने पावले उचलली आहेत. भेंडखोल भंडारी समाजाने मंदिराच्या जिर्णोद्वारासाठी खासदारांकडे केलेल्या मागणीला प्रतिसाद देत, त्यांनी आपल्या खासदार निधीतून २५ लाख रुपयांची मदत मंजूर केली असून, त्याचा पहिला टप्पा भूमिपूजनाने सुरू झाला आहे.

या सोहळ्याला भंडारी समाजाचे अध्यक्ष विराट मयेकर, उपाध्यक्ष केतन कोलथरकर, सचिव विशाल कोलथरकर, खजिनदार सुयोग मयेकर, तसेच समाजातील विविध पदाधिकारी – प्रणय पुलेकर, प्रथमेश, स्वप्नील, अंकित कोलथरकर, देवेंद्र पाटील, विक्रांत कोलथरकर, सुभाष कोलथरकर, विजय पाटील उपसरपंच – हरिहरेश्वर ग्रामपंचायत, महिला अध्यक्षा तवसाळकर , कोलथरकर , आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा सर्वांनी सहभोजनात आनंद घेतला.

## ताम्हाणी घाटात अपघात; सहा जखमी

**माणगाव :** ताम्हाणी घाटात सणसवाडी गावचे हददीत शनिवारी पहाटे इरटिका गाडीच्या झालेल्या अपघातात सहा जण जखमी झाले

माणगाव पोलीस ठाणे हद्दीत ( दि. १२ ) रोजी पहाटे ३.३० वाजता इरटिका गाडीच्या चालकाने मुरुड येथे जात असताना हयगयीने बेदरकारपणे वाहन चालवुन वळणावर गाडी कंट्रोल न करता आल्याने रोडच्या उजव्याबाजुला असलेल्या कातळाला जावुन ठोकर लागुन अपघात झाला आहे या अपघातात १) वैभव शिवश्याम खेणे, २) आरबाज राजु मुलानी, ३) रोहीणी गावटे, ४) जायद वकील अन्सारी, ५)ज्ञान अशोक धोका, ६) महेंद्र जोशी सर्व रा पुणे जखमी झाले

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आलाअसून अधिक तपास पोहवा प्रफुल्ल पवार करीत आहेत.



**रोहे : येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पुरातन श्री हनुमान मंदिरात जयंतीनिमित्त मंत्री आदिती तटकरे यांनी दर्शन घेतले. त्यांचा श्री मारुती मंदिर ट्रस्टतर्फे शाल श्रीफळ आणि गुलाबपुष्प देऊन विश्वस्त आनंद कुळकर्णी, मोतीलाल जैन आणि अरुण करंबे यांनी सन्मान केला. या वेळी स्वरांजली शिर्के, ज्योती सनीलकुमार आदी उपस्थित होते**

# सामाजिक क्रांतीचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

***भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांचा उदय म्हणजे उपेक्षित,तेजोहिन अन् सामाजिक चेहरा नसलेल्या समाजघटकांमध्ये मानवी हक्कांबद्दल जागृतता निर्माण करणाऱ्या क्रांतीसूर्याचे उदयच म्हणावे. जाती–पातीच्या विषमतेवर मनुवादी समाजव्यवस्थेतून शेकडो वर्षे गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या दलित–पददलित मागास लोकांना नवा सामाजिक चेहरा देण्याचं व त्यांना बोलकं करण्याचं ऐतिहासिक कार्य महानायक बाबासाहेब डॉ.आंबेडकर यांनी केलं.त्यातून तथाकथित समाजातलीवर्णव्यवस्था व जातीभेदाचे समूळ उच्चाटन करत देशात सामाजिक समता प्रस्थापित केली.***

सामाजिक क्रांती घडवून आणणाऱ्या बाबासाहेबांचे स्थान आजही आधुनिक भारताच्या इतिहासात सह्याद्रीसारख अढळ आहे. अखिल मानवजातीला सामाजिक समतेचा संदेश देणारे महामानव बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांचा १४ एप्रिल हा जयंती दिन कॅनडा सरकारने मागील वर्षी समता दिन म्हणून देशात साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. विश्वरत्न बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर हे केवळ भारतालाच नव्हे तर,साऱ्या जगताला हवे हवेसे वाटायचे.मागील काळात ऑक्सफर्ड विद्यापीठाने जगातील १०० महान विद्वानांची यादी तयार केली होती,त्यात बाबासाहेबांचे नाव अग्रभागी होते,ही गोष्ट भारतीयांच्या दृष्टीने मोठ्या अभिमानाची आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी माता रमाई भिमराव आंबेडकर यांनी आपल्या जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांना भक्कम साथ दिली.बाबासाहेबांच्या त्या खऱ्या अर्थाने सावलीच होत्या.संघर्षमय अन् स्वाभिमानी जीवन जगत अखेर त्यांनी जगाचा निरोप घेतला.दरम्यान बाबासाहेब आजारी पडले असता,ते हॉस्पिटलमध्ये दाखल असताना,तेथे त्यांची देखभाल करणाऱ्या डॉ.सविता कबीर यांच्याशी ओळख झाली अन् पुढे त्याचं रूपांतर सन १९४८ मध्ये विवाहात झालं.असा हा संमिश्र जीवन प्रवास युगपुरुष बाबासाहेब यांचा राहिला.ते स्वतः स्वाभिमानाने जगले अन् आपल्या अनुयायांनादेखील स्वाभिमानाने जगण्याची दीक्षा दिली.म्हणूनच त्यांना महामानव म्हणून संबोधिले जाते.

शिक्षणाचा सर्वदूर प्रसार व्हावा,या उद्देशाने बाबासाहेबांनी औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेज तर,मुंबईमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून सिद्धार्थ कॉलेज,लॉ कॉलेज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्ट्स,कॉमर्स महाविद्यालय सुरू केलीत. तसेच महाड, दापोली, पंढरपूर, नांदेड आदी ठिकाणी सुमारे २० हून अधिक शैक्षणिक संस्था स्थापन केल्यात. बाबासाहेबांनी गोरगरीब,गरजू,आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व मागास घटकांसाठी शैक्षणिक सोयी–सुविधा व शिष्यवृत्त्या जाहीर करून त्यांच्यासाठी शिक्षणाची कवाडं उघडी केली.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे घटनाकार बाबासाहेब डॉ.आंबेडकर हे शेतकऱ्यांचे कैवारी होते.शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी त्यांनी पार्लमेंटमध्ये अनेकदा आवाज उठविला.त्यांच्या मते,भारतीय शेतकरी हा कर्जात जन्मतो, कर्जात जगतो अन् कर्जातच मरता यासाठी व्यवहार्य मार्ग म्हणजे सामुदायिक शेतीचा प्रयोग करून जे उत्पादन येईल,त्यातील सरकारचा हिस्सा वगळून,उर्वरित उत्पादन शेतकऱ्यांना सम –समान पद्धतीने वाटप करावे,असा मोलाचा सल्ला बाबासाहेबांनी सरकारला दिला.कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग क्षेत्रावर भर दिला गेला पाहिजे.सरकारने कृषीपूरक उद्योग उभारले पाहिजेत,जेणेकरून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.कृषी उत्पन्नावर कर लावू नये. शेतकऱ्यांविषयीचा सरकारचा दृष्टिकोन पारदर्शक व सकारात्मक असावा.त्यांचे सर्वांगीण हित जपणारा असावा. शेती हा सरकारी धंदा (व्यवसाय)म्हणून असावा,असे त्यांचे प्रामाणिक मत होते. कारण त्यामुळे नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची झळ थेट बळीराजाला पडू शकणार नाही. छोटे अल्पभूधारक,कोरडवाहू शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर बाबासाहेबांनी लोकसभेत परखड अन् रोखठोक मतं मांडली होती.सरकारने अन्नदाता शेतकऱ्यांचे कुठल्याही परिस्थितीत हित जपावे,हा त्यांचा नेहमी आग्रह असायचा.त्यांनी सदैव बळीराजाची पाठराखण केली,कारण ते शेतकऱ्यांचे भाग्यविधता होते.

केंद्रीय कायदा मंत्री असताना बाबासाहेबांनी स्त्री शिक्षण, स्त्री–पुरुष समानता अन् स्त्री स्वातंत्र्यावर अधिक भर दिला.तसेच महिलांच्या हितासाठी वीसहून अधिक कायदे केलेत.हिंदू मॅरेजअॅक्टचे निर्माते खऱ्या अर्थानं बाबासाहेबच आहेत.कायद्याद्वारे वडिलांच्या संपत्तीत मुलीला लग्नानंतरही मुलाबरोबरीचा समान हक्क प्रदान केला.. तो बाबासाहेबांनीच.स्त्री शिकली तर,कुटुंबासह समाजाला शिक्षित करण्याची तिच्यात धमक असल्याचे बाबासाहेबांचे ठाम मत होते.महिलांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणून आत्मनिर्भर बनविण्याचं अन् स्वाभिमानाचं जीवन जगण्याची सकल स्त्री जातीला त्यांनी दिशा दाखविली.परिणामी आज महिला सबलीकरण होऊन त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात आघाडी घेतांना दिसत आहेत.

स्वतंत्र देशाचा राज्यकारभार सनदशीर मार्गाने चालविण्यासाठी राज्यघटनेची आवश्यकता असते,हे जाणून घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांना मसुदा समितीचे अध्यक्ष नेमून भारतीय संविधान तयार करण्याची जबाबदारी सोपविली.याशिवाय मसुदा समितीत काही तज्ज्ञ मान्यवरांची देखील सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.या समितीने विविध देशांचे दौरे केले.अन् तेथील राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून त्यातील आपल्या देशास उपयुक्त असणाऱ्या तरतुदी संकलित केल्या.तब्बल २ वर्षे,११ महिने,१८ दिवस विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास केल्यावर देशांतर्गत दौरे करुन राज्यांमधील भौगोलिक परिस्थिती,संस्कृती,जीवन पद्धती,रीतिरिवाज,भाषा आदी बाबींचा सखोल अभ्यास करून अंततः भारतीय संविधान नावरूपाला आले अन् २६ नोव्हेंबर १९४९ रोजी त्याला मान्यता मिळून,त्याद्वारे २६ जानेवारी १९५० पासून भारतातसार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य म्हणून एका नव्या पर्वाला सुरुवात झाली.

भारतीय नागरिकांना व्यक्ती स्वातंत्र्य(जीवन जगण्याचे स्वातंत्र्य),विचार स्वातंत्र्य(अभिव्यक्ती स्वातंत्र्य),धार्मिक स्वातंत्र्य, उदरनिर्वाहासाठी व्यवसाय–नोकरी करण्याचे स्वातंत्र्य,न्यायालयात दाद मागण्याचे स्वातंत्र्य,शिक्षण स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकार(हक्क) राज्यघटनेच्या माध्यमातून बहाल करण्यात आले.या हक्कांचा उपभोग घेताना प्रत्येक नागरिकाने इतरांच्या हक्कांची पायमल्ली होणार नाही,याची पुरेपूर खबरदारी घ्यावी,असं त्यांनी राज्यघटनेत प्रकर्षाने नमूद केले.

आपले राज्य धर्मनिरपेक्ष असल्याने प्रत्येकाने दुसऱ्याच्या धर्माचा आदर करावा. कुठल्याही घटनात्मक प्रमुखाने राज्यकारभार करताना विशिष्ठ धर्माला झुकते माप देऊ नये,तर सर्व धर्मांना समान लेखावे. राज्यकर्त्यांनी जाती–धर्माच्या नावावर भेदाभेद करू नये. राज्यघटना,राष्ट्रध्वज अन् राष्ट्रगीत यांचा राज्यकर्ते व सर्वधर्मीय नागरिकांनी सन्मान करावा. यातूनच भारतीय संसदिय लोकशाही ही जगात आदर्श राज्यप्रणाली ठरेल,हे निश्चित.दादरमधील इंदू मिलच्या प्रांगणात डॉ. आंबेडकरांचे स्मारक उभारलं जात आहे. खरंतर हीच खरी युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली ठरेल.

**–अशोक गायकवाड**

## रेवदंड्याजवळ कारच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**रेवदंडा** : मौजे वढाव बुद्रुक गावचे हददीत खानाव बाजुने वढाव बुद्रुक गावचे नाक्याकडे पायी चालत येत असताना वढाव बुद्रुक बसस्टॉपजवळ खानाव बाजुकडे जाणार्या सफेद रंगाची एर्टीगा कारचे चालकाने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अतिवेगाने व हयगयीने वबेदरकारपणे कार चालवुन रस्त्याने पायी जात असलेल्या गणेश पाटील यांना धडक दिली

यामध्ये त्यांचा मृत्यु झाला याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.फौज.दिनेश रामनाथ पिंपळे हे करीत आहेत.

**सुवर्ण संधी**

पनवेल गोवा रस्त्या लगत हवेशीर,१ bhk सदनिका ३ बाल्कनी सहित अत्यंत आकर्षक किंमती मध्ये,तयार ताबा, उपलब्ध आहे.

–: संपर्क :–
९८३३१८९३१९,
९८२००७७३४७

# बसथांबा बनतोय वामकुक्षीचे ठिकाण

## नेरूळमधील विविध ठिकाणी प्रकार



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपा परिवहन उपक्रमाकडून नेरूळमधील विविध ठिकाणी बस थांबे-डेपो उभारले गेले, पण या बस थांब्यामध्ये असलेल्या आसन व्यवस्थेच्या ठिकाणी प्रवाशी असणे अत्यावश्यक आहे, परंतु त्या ठिकाणी चक्क भिकारी, बेघर नागरिक व नशापान करणारे व्यक्ती वामकुक्षीचा आनंद घेत असल्याने प्रवाशातून नाराजी व्यक्त होत आहे.

नवी मुंबईतील प्रवाश्यांना एनएमएमटी आणि बेस्ट बसेसची विविध बस थांब्यावर वाट पहावी लागते. प्रवाश्यांना बसची प्रतीक्षा करताना ताटकळत उभे रहावे लागू नये म्हणून आरामदायी बस सेल्टरची परिवहन उपक्रमाकडून निर्मिती करण्यात आली आहे, परंतु काही बस निवाऱ्यामध्ये प्रवाशी बसलेले दिसत नाही, पण ज्याचा काहीही संबंध नाही असे घटक आराम करताना आढळून येत असल्याचे दृश्य पाहायला मिळत आहे.

बस निवाऱ्यामध्ये आराम करण्यासाठी आलेल्या नागरिकांना उठवायला गेल्यास ते उठत नाहीत, अशांना मज्जाव केल्यास प्रवाशावरच धावून जातात. प्रवाशी मात्र त्यांच्याशी वाद न घालता बस थांब्याच्या लगत उभे राहून बस येण्याची वाट बघत असतात. यामुळे प्रवाशी नाराजी व्यक्त करत आहेत. विशेषतः नेरूळमधील बांचोली चौक जवळीक बस स्टॉप, नेरूळ सेक्टर ३ मधील बस स्थानक, सारसोले बस स्थानक आदी ठिकाणी सर्रास भिकारी, गर्दुल्ले आणि उपद्रवमूल्य नागरिकांनी बस्थान मांडलेले पहावयास मिळते.

आता गर्मीचा हंगाम सुरू झाला आहे. कडक उन्हाच्या झळा बसत आहेत. त्यामुळे या कालावधीत प्रवाश्यांना सेल्टरमध्ये बसावे लागत आहे, म्हणून आराम करणाऱ्या घटकांवर परिवहन उपक्रमाने कारवाई करावी तसेच काही बस डेपोत सुरक्षा रक्षक तैनात करण्यात यावेत, अशी मागणी प्रवाशी वर्ग करत आहे.

> **बस सेल्टरमध्ये आराम करणारे नागरिक जागा आडवत असतील तर त्यावर कार्यवाही करण्यास सांगितले जाईल,तसेच सारसोळं बस डेपोतील प्रकरणी नेरुळ पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.**
>
> **-योगेश कडूस्कर,**
> **व्यवस्थापक, परिवहन उपक्रम, पालिका**

# तुर्भे परिसरात नागरिकांना सतावतेय पाण्याची समस्या

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे एमआयडीसी परिसरातील इंदिरा नगर, गणपती पाडा, परिसरात गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून पाण्याची समस्या भेडसावत आहे. या सर्व ठिकाणी अनियमित पाणीपुरवठा होत आहे. कधी-कधी सलग दोन किंवा तीन दिवस पाणीपुरवठा होत नाही. स्वतःच्या मालकीचे धरण असून ही येथील वस्त्यांना आपली तहान एमआयडीसीच्या पाण्यावर भागवावी लागते.

मोरबे धरण ओव्हर फ्लो होऊनही येथील नागरिकांना आजही पाण्याच्या भीषण टंचाईला सामोरे जावे लागत आहे. अनियमित व रात्री अपरात्री होणाऱ्या पाण्यामुळे तसेच काही दिवसांपासून एमआयडीसी प्रशासनाकडून मध्यरात्रीच्या सुमारास पाणी सोडले जात असल्याने पाण्यासाठी रात्र-रात्र जागवून पाणी भरावे लागते. इंदिरानगरमधील काही भागात सुरळीत पाणी पुरवढा होतो तर काही भागात रात्री अपरात्री पाणी पाणीपुरवठा होत आहे.

पाण्याची भीषण टंचाई ही गणपती पाड्यात पाहायला मिळत आहे. दोन हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या या ठिकाणी होणारा पाणी पुरवठा हा अनियमित तसेच रात्री-अपरात्री होत आहे. या शिवाय पाण्याचा प्रवाहदेखील कमी दाबाने होत आहे. या ठिकाणी होणारा पाणीपुरवठा हा एमआयडीसीकडून होत आहे. ज्यावेळी एमआयडीसी कडून जलवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी शटडाऊन घेतला जातो, त्यावेळी तर शुक्रवार पासून जो पाणी पुरवठा बंद केला जातो तो रविवारी संध्याकाळनंतर सुरळीत होतो.

अनियमित पाण्यामुळे हाणामारीचे प्रसंगदेखील उद्भवले जातात. अनेक जण पाणी मिळावे यासाठी मोटर लावतात. ज्याच्या कडे मोटर नाही त्याला कमी दाबाने किंवा पाणीच येत नाही अशा वेळीदेखील जोरदार भांडणे सुरू होतात.

तुर्भे एमआयडीसी परिसरात असणाऱ्या झोपडपट्टीमध्ये अल्प मध्यमवर्गीय आणि श्रमिक कष्टकरींच्या वस्त्या आहेत. पाणी वाहून नेणाऱ्या काही पाइपलाइनही नाल्याखालून गेल्या आहेत. तर, काही ठिकाणी टेकडीवर पाईपलाईन टाकण्यात आल्या आहेत.

> **लवकर दूर करण्याची मागणी**
>
> अनेक ठिकाणी नाल्यातही पाणी गळती होत असते. तर, टेकडीवर पाण्याचा दाब कमी असल्यावर पाणी चढत नाही. त्यामुळे रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. चार ते पाच तास थांबून राहावे लागते. त्यामुळे त्यांना कामावर जाण्यासही अडचण होते. त्यामुळे पाण्याची ही समस्या लवकरात लवकर दूर करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## निवडक

### व्यापाऱ्याची फसवणूक

**नवी मुंबई :** एपीएमसीमधील व्यापाऱ्याची सात लाख ५९ हजारांच्या फसवणुकीची घटना घडली आहे. पुरुषोत्तम मिठीया असे व्यापाऱ्याचे नाव असून त्यांच्याकडून अंधेरी परिसरात राहणाऱ्या हुसेन शेख याने धान्य खरेदी केले होते, मात्र त्याच्या बिलाची रक्कम न देता फसवणूक केली. व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### घणसोलीत बांगलादेशीला अटक

**नवी मुंबई :** घणसोलीतल्या कौलआळीमधील पृथ्वी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या बांगलादेशी तरुणाला रबाळे पोलिसांनी अटक केली आहे. एक महिन्यापासून तो बेकायदेशीरपणे राहत असून, मजुरी करत होता. या प्रकरणी त्याच्यावर रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे थ्रीडी बॅनर झळकले



**नवी मुंबई : बातमीदार**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त भिमरत्न युवा संघ यांच्या वतीने दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळी नेरूळ १०/८ नवी मुंबई येथे भव्य दिव्य ३डी बॅनरचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी उपस्थितांनी भिम गीतांवर नृत्य करत आनंद व्यक्त केला. प्रमाणात युवा व महिला लहान मुलांनी उपस्थित दर्शविली.

भिमरत्न युवा संघचे अध्यक्ष रवी सोनवणे, उपाध्यक्ष संकेत केदारे आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. या वेळी कामगार नेते रवींद्र सावंत, आरपीआय नवी मुंबई अध्यक्ष महेश खरे, श्रीकांत जाधव व इतर स्थानिक पक्षाचे कार्यकर्ते नेते उपस्थित होते.

# बाजारपेठ निळ्या रंगाने सजली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने निळ्या रंगाने बाजारपेठ सजली आहे. झेंडे, पताका, कुर्ती, फेटे, मफलर अशा विविध वस्तू बाजारात विक्रीस दाखल झाल्याचे पहावयास मिळत आहे.



भीम अनुयायी तरुणांकडून या वस्तूला विशेषत:मागणी आहे. मोठ-मोठे झेंडे खरेदी, त्याचप्रमाणे 'जय भीम' लिहिलेली रिबीन, कागदी, कापडी, प्लास्टिक पताका, आकाश कंदील, काठ्या यांची मागणी अधिक आहे. नवी मुंबईतील तुर्भे जनता मार्केट बाजारपेठेत खरेदीसाठी भीम अनुयायीची मोठी गर्दी होती.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा वस्तूंच्या दरात १० ते १५ टक्के वाढ झाली असल्याचे दुकानदारांनी सांगितले. भीम अनुयायी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. रस्ते, चौक ठिक-ठिकाणी झेंडे, पताका कमानी उभारण्यात आल्या आहेत. तसेच मंडप उभारणी, विद्युत रोशनाईची कामेदेखील पूर्ण झाली असून जयंतीच्या स्वागताला भीम अनुयायी सज्ज झाला आहे.

# १०० दिवस कृती आराखडा कालावधीत नमुंमपा ९७ अधिकारी, कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतून सर्व शासकीय - निमशासकीय कार्यालयांत राबविण्यात येणाऱ्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यातील सात कलमांच्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका अधिकारी-कर्मचारी कल्याणाच्या बाबींकडेही आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे बारकाईने लक्ष असून प्रलंबित असलेली नमुंमपा अधिकारी/ कर्मचारी यांची पदोन्नती तसेच त्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे या विषयांकडे प्रशासन विभागाने विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले आहेत.



या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री. शरद पवार व पदोन्नती निवड समितीने १०० दिवसांच्या कृती आराखडा कालावधीत म्हणजे जानेवारी २०२५ पासून १८ संवर्गातील ९१ अधिकारी - कर्मचारी यांना पदोन्नती तसेच १८ संवर्गातील ८० अधिकारी, कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केलेली आहे. त्यामध्ये विशेष बाब म्हणजे ११ एप्रिल रोजी त्यामधील १२ संवर्गात ८२ अधिकारी - कर्मचारी यांना पदोन्नती तसेच १६ संवर्गातील ७७ अधिकारी, कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केलेली आहे.

यासोबतच महापालिका प्रशासन विभाग आणि शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे व पदोन्नती निवड समितीने सहा शिक्षकांना पदोन्नती तसेच १२३ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली आहे.

अशाप्रकारे प्रशासन व शिक्षण विभाग मिळून ९७ अधिकारी-कर्मचारी-शिक्षक यांची पदोन्नती तसेच २०३ अधिकारी-कर्मचारी-शिक्षक यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / वरिष्ठ वेतनश्रेणी लाभ मिळालेला आहे.

मागील वर्षभरात म्हणजे एप्रिल २०२४ पासून तब्बल २३१ अधिकारी - कर्मचारी - शिक्षक यांना पदोन्नती तसेच ४०२ अधिकारी - कर्मचारी - शिक्षक यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

या कार्यवाहीला १०० दिवसांच्या कृती आराखडा कालावधीत अधिक गती देण्यात आली असून नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी, शिक्षकवृंदाला सेवांतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन विभाग गतीशील काम करीत आहे. यामुळे नमुंमपा अधिकारी, कर्मचारी, शिक्षकवृंदामार्फत समाधान व्यक्त करण्यात येत असून याचा सकारात्मक परिणाम दैनंदिन कामकाजावर होणार आहे व नागरिकांना उत्तम सेवा सुविधा पूर्ततेसाठी तसेच शैक्षणिक गुणवत्तावाढ होण्यासाठी ही बाब उपयोगी ठरणार आहे.

# खारघर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा आणि विचार व्याख्यान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईत विविध धार्मिक संस्था-संघटना आणि राजकीय पक्षांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सोमवारी (दि.१४) साजरी होत आहे. खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने सकाळी ९ वाजता शांताबाई रामराव सभागृह सेक्टर-७, सत्याग्रह कॉलेज खारघर येथे प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक प्रेरणा आणि विचार या विषयावर चिंतन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आदर्श शिक्षण संचालक-संस्थाचालक यावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वत्कृत्व स्पर्धा होणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथ संपदा प्रदर्शन देखील भरवण्यात आले आहे. प्रदर्शन दिवसभर डॉ आंबेडकर अनुयायीसाठी खुले असून सदर ठिकाणी भेट द्यावी, असे आवाहन प्राचार्या नेहा राणे आणि प्राचार्य वनिता सूर्यवंशी यांनी केले आहे.

ऐरोली-रबाळे परिसरात मातोश्री अनुसया संभाजी सोनावणे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन छत्रपती शाहू महाराज विद्यालय आणि मा. कांशीराम हिंदी विद्यालयात सकाळी करण्यात आले आहे.

या ठिकाणी शालेय विध्यार्थी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहेत. पंचशील बुद्ध विहारात विविध धार्मिक कार्यक्रम तर दुपारी सर्वासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ऐरोली-रबाळे परिसरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून यात आंबेडकर अनुयायींनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे माजी नगरसेविका रंजना सोनावणे आणि माजी नगरसेविका डॉ. गौतमी सोनावणे यांनी कळविले आहे.

सीबीडी-आयकर कॉलनी येथे धम्मंदिप दमाजिक संस्थेच्या वतीने डॉ आंबेडकर जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी दिवसभर विविध स्पर्धा तर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम असून सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदेश रेवले यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वाटप होणार असल्याचे आयोजक सुभाष गायकवाड यांनी सांगितले. नेरुळ जयंती उत्सव समितीच्या वतीने मिरवणूक काढण्यात येणार आहे.

भव्य मिरवणूकीची सुरुवात नेरुळ सेक्टर १२ येथील रामलीला मैदान येथून होणार असून यात मोठ्या संख्येने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायीनी सहभागी व्हावे असे भीम महोत्सवचे प्रणेते शरद सरवदे यांनी कळविले आहे. तुर्भे नाका येथे परिवर्तन सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष राजेंद्र बनसोडे, संजय जवादे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे.

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड :** सध्या अतिशय उकाडा होत असल्याने सलग सुट्टीत पर्यटक समुद्राच्या पाण्यात मनसोक्त मौज करीत आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

# शिक्षण व ज्ञानासंपदेला महत्त्व देणारे डॉ. बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी -प्रा.निळे

**नवी मुंबई : बातमीदार**

बाबासाहेबांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे शिक्षणाचा ध्यास आणि ज्ञानाची आस असून बाबासाहेबांचा अनुयायी म्हणून घ्यायचे असेल तर शिक्षणाला महत्त्व दिले पाहीजे असे सांगत शिक्षण आणि प्रबोधन हाच उन्नतीचा मार्ग आहे, अशा शब्दात नामवंत व्याख्याते प्रा.मृदुल निळे यांनी विचारमंथन केले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात बाबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून पंधरवडाभर आयोजित करण्यात आलेल्या 'जागर' व्याख्यानमालेमध्ये मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक, संशोधक मृदुल निळे यांनी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजातील उपेक्षितता, मुक्ती आणि जाणीव' या विषयावर विवेचन केले.




आपल्या सुसंवादात त्यांनी बौध्द धर्म स्विकारतानाही बाबासाहेबांनी समाजाला स्वत:ची ओळख देणे गरजेचे असल्याचे जाणले व तर्कशुध्दता, सुधारणा व विवेक या त्रिसूत्रीच्या आधारावर उभ्या असलेल्या बौध्द धर्माचा स्विकार केला हे सांगितले. बाबासाहेबांच्या समानतेवर आधारित देशनिर्मितीचा भाषणाचा दाखला देत प्रा.मृदुल निळे यांनी सामाजिक व आर्थिक समानता हाच विकासाचा आधार असल्याचे मत व्यक्त केले.

अत्यंत मुद्देसूद व आकडेवारीसह ठोस माहिती देत सादरणीकरणाद्वारे केलेल्या प्रा.मृदुल निळे यांच्या व्याख्यानाचा लाभ जाणकार श्रोत्यांनी मोठ्या संख्येने घेतला.

# बेशिस्त डंपरचालकांकडून विजेच्या खांबांना धडक

## ◆ श्रीवर्धन येथील जीवना व दांडा येथील प्रकार



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथील जीवना बंदर या ठिकाणी जेट्टीचे मोठ्या प्रमाणावरती काम सुरू आहे. त्याचप्रमाणे श्रीवर्धन दांडा या ठिकाणीदेखील जेट्टीचे काम सुरू आहे. या जेट्टीच्या कामासाठी डंपरमधून दगडांची वाहतूक करण्यात येत आहे, मात्र काही बेशिस्त डंपरचालकांच्या बेपर्वाईपणामुळे अनेक वेळा महावितरणच्या विजेच्या खांबांना धडक मारण्यात येऊन, श्रीवर्धन शहरातील वीजपुरवठा तासंतास खंडित होत आहे. एका फोलला जोरदार धडक बसल्यानंतर सोबत दोन ते तीन पोलचे नुकसान होते. त्याचप्रमाणे त्या ठिकाणच्या सर्व वीज वाहकतारा तुटून जातात.

त्यामुळे वीज पुरवठा पूर्ववत करण्यास महावितरणच्या कर्मचाऱ्यांना जवळजवळ सात ते आठ तासांचा कालावधी लागतो. सध्या सुट्ट्यांचा मोसम सुरू झाला आहे. शनिवारी श्रीवर्धन शहरातील हॉटेल व रिसॉर्ट्स पूर्णपणे फुल आहेत. अशावेळी वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अनेक ठिकाणी हॉटेल चालकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

पंधरा दिवसापूर्वी श्रीवर्धन येथील आंबेडकर चौकामधील एका वीज खांबाला एका डंपरने धडक मारल्यानंतर जवळजवळ साडेसात तास वीज पुरवठा खंडित झाला होता. दांडा जेटीसाठी दगड वाहतूक समुद्र किनाऱ्याच्या बाजूने करण्यात येते. या ठिकाणाहूनच डंपरची लाईन जात असताना मोरया बीच हाऊस समोर असलेल्या वीजेच्या खांबाला डंपर ने डंपर मागे घेताना जोरदार धडक मारल्याने त्या ठिकाणचे दोन पोल तुटल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे विजांच्या तारादेखील तुटलेल्या असून त्या रस्त्यावरती लोंबकळत असल्याचे दिसत आहे.

### समज देण्याची मागणी

**हा प्रकार दुपारी बारा वाजता घडला होता, परंतु वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कंत्राटी ठेकेदार दुपारी तीन नंतर त्या ठिकाणी काम करण्यासाठी हजर झालेले आहेत. तरी दगडाची वाहतूक करणाऱ्या डंपर मालकांनी व सदर जेट्टीचे काम करणाऱ्या कंपनीने डंपरचालकांना योग्य ती समज द्यावी, अशी मागणी श्रीवर्धनमधील स्थानिक नागरिकांकडून व पर्यटनाशी निगडीत व्यावसायिकांकडुन करण्यात येत आहे.**

# उद्योजकांसोबत दरमहा जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी तसेच त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्ह्यातील उद्योजकांसोबत दरमहा जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहीर केले. जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद -२०२५ कार्यक्रमात रायगड जिल्ह्यात एकूण २३११ कोटी रुपये गुंतवणूकीचे सामंजस्य करार झालेले असून यातून एकूण २८६५ इतकी रोजगार निर्मिती होणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीच्या संधी, राज्यातील उत्पादने यांची निर्यातवृध्दी तसेच औद्योगिक विकासाकरीता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाकडून जिल्हा गुंतवणूक परिषद २०२५ चे आयोजन जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय-अलिबाग येथे करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते.

या परिषदेकरित उद्योग सह संचालक, कोकण विभाग श्रीमती विजू शिरसाठ,प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा श्रीमती. मोरे, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, श्री. जी. एस. हरळय्या, स्टेट बँक ऑफ इंडिया विभागीय व्यवस्थापक श्री. विलास शिंदे तसेच जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटनेच्या अध्यक्षासह सुमारे २५० पेक्षा अधिक उद्योजक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व सामंजस्य करार धारकांना पुढील गुंतवणूक कालावधीत शासकीय सर्व कामे प्राधान्याने करण्यात येवून पुढील कालावधीत जास्तीत जास्त रायगड जिल्ह्यात रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल असे सांगितले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात रायगड -जिल्ह्याने प्रथमच १०० टक्के उद्दीष्टपूर्ण केल्याने जिल्हा उद्योग केंद्र व सर्व बँकांचे अभिनंदन व आभार मानले. रायगड जिल्ह्यातील आस्तित्वातील सर्व उद्योजकांचे १०० दिवशीय कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा उद्योग मित्र समितीच्या अनुषंगाने समस्या विषयी चर्चा करण्यात आली.

उद्योग सह संचालक, कोकण विभाग, श्रीमती विजू शिरसाठ यांनी जिल्हा गुंतवणूक परिषदेचे उद्देश व एंकदरीत कोकण विभागातील औद्योगिक विकास व विस्तार याबाबत नमूद करुन मुख्यमंत्री रोजागार निर्मिती कार्यक्रम सारख्या - शासनाच्या महत्वकांक्षी कार्यक्रमात रायगड जिल्ह्याने १०० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दीष्ट यावर्षी साध्य केल्याबद्दल सर्वाचे अभिनंदन केले. उद्योग विभागाने मैत्री २.० सारखे अत्याधुनिक पोर्टल मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते सुरु केल्याने नविन गुंतवणूकदारांना एक खिडकी सुविधा प्राप्त झालेले आहे.

सामंजस्य करारातील काही उद्योजकांना जिल्हाधिकारी, रायगड यांच्या हस्ते सामंजस्य कराराचे वाटप करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत १००% उद्दीष्ट्र पूर्ण केलेल्या बँकाचे प्रशस्ती पत्रक देऊन या वेळी गौरविण्यात आले.

जिल्हा गुंतवणूक परिषदेस एमआयडीसी, नगर रचना विभाग, न्यू इंडिया इन्शुरन्स, मैत्री, इंडियन पोस्ट या विभागाचे सादरीकरण करण्यात आले. सदर जिल्हा स्तरीय गुंतवणूक परिषदेकरिता रायगड जिल्ह्यातील एकूण २२५ पेक्षा अधिक उद्योजकासह जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटनाचा सहभाग होता.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, जी. एस. हरळय्या यांनी जिल्ह्यातील उद्योगांच्या विकासा करिता जिल्हाधिकारी यांच्या सुक्ष्म नियोजन व सक्रिय सहभाग असल्याने उद्योगाचा विकास प्राधान्याने होत असल्याचे नमूद करुन विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनाने आजची गुंतवणूक परिषदेचे आयोजन केल्याचे नमूद केले.

# रोह्यात हनुमान जयंती उत्साहात साजरी



**रोहे : प्रतिनिधी**

रोहे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सुबक मूर्ती असलेल्या पुरातन श्री हनुमान मारुती जन्मोत्सव मोठ्या भक्ती भावनेने साजरा झाला.

शनिवारी पहाटे ५-३०वाजता जन्मोत्सवाचे श्रीमती सुषमा माधव भावे यांचे सुश्राव्य किर्तन झाले. पूजा,अभिषेक, आरती आणि प्रसाद कार्यक्रम तसेच मंदिरात विद्युत रोषणाई, रांगोळ्या रंगीबेरंगी फुलांच्या माळांनी मंदिर सुशोभीत करण्यात आले होते. श्री. हनुमान मारुती व श्रीरामाची गोड गीतांनी परिसर दुमदुमाला होता. सायंकाळी ६ वाजता रेवरदंडा येथील ह.भ.प.श्री. संदीप वामन केळकर व रोहे येथील प्रसिद्ध श्री. मंदार माधव भावे व त्यांचे अन्य साथीदार यांचा अत्यंत सुंदर अभंगवाणी नाट्य गीतांचा अविष्कार हा अविस्मरणीय उत्तम कार्यक्रम झाला. सकाळपासून रात्री ११ वाजेपर्यंत हजारो भक्तांच्या दर्शना साठी रांगा लागल्या होत्या. ना. आदिती तटकरे यांनीदेखील हनुमान देवाचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांचा श्री. मारुती मंदिर ट्रस्ट तर्फे विश्वस्त यांनी शाल, श्रीफळ आणि गुलाब पुष्प देऊन सत्कार केला.

कार्यक्रम यशस्वी करण्या साठी मारुती मंडळ ट्रस्टचे विश्वस्त आनंद कुळकर्णी, मोतीलाल जैन अरुण करंबे तसेच दिलीप शंकर पवार, चिंतामणी लवकरे, दांडेकर वहिनी सुरेंद्र आगरकर, दिलीप पवार व अन्य भक्त गणांनीफार मोठे परिश्रम घेतले. हनुमान टेकडी मंदिर येथेही जन्मोत्सव साजरा करण्यांत आला.

# आमदार संजय केणेकर यांचे कार्य उल्लेखनीय -राजू साळुंखे



**अलिबाग :** भटक्या विमुक्तांचे आधारस्तंभ आमदार संजय केणेकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे, असे मत भटके विमुक्त आघाडी भाजप राज्य सरचिटणीस राजू साळुंखे यांनी भाजपचे नुकतीच निवड झालेले विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर यांच्याबद्दल व्यक्त केले.

या वेळी त्यांचे स्वागत भाजप राज्यचिटणीस राजू साळुंखे व इतर मन इतर मान्यवर मंडळींनी केले. या वेळी राजू साळुंखे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले तसेच तसेच नवनिर्वाचित आमदार संजय केणेकर रायगड जिल्ह्यासह राज्यातील भटक्या विमुक्तांच्या समस्या सोडवण्यासाठी मोलाचे योगदान देतील, असा विश्वास राजू साळुंखे यांनी व्यक्त केला.

# सुधागड तालुक्यात हनुमान जन्मोत्सव सोहळा



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील श्री हनुमान जन्मोत्सव पाली,मजरे जांभूळपाडा, पेडली, खुरावले, माणगाव बुद्रुक, वाकणवाडी, गौळमाल, म्हसेवाडी, पोटलज खुर्द, कळंबोशी याठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले.


सकाळी जन्म सोहळा, महिलांचे हळदी कुंकू, पालखी सोहळा, हरिपाठ, किर्तन, महाप्रसाद,सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडास्पर्धा,सत्कार सोहळा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भाविक मुंबई, पुणे,ठाणे,येथून मोठ्या संख्येने दाखल झाले होते तसेच जन्म सोहळ्यानिमित्त विविध पदाधिकारी,सामाजिक कार्यकर्ते यांनी कार्यक्रमस्थळी भेटी देऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली.



**रोहा : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे सुतारवाडी येथील हॅलिपॅडवर तालुका भाजपच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांभेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर आदी उपस्थित होते.**

# अजंठा बोटीतून प्रवास करणारे कासार दाम्पत्य सुखरूप बचावले



**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबागनजीक समुद्राजवळ शनिवारी अजंठा कंपनीच्या कॅटमरॉन प्रवासी बोटीमध्ये झालेल्या घटनेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरूडमधील प्रमुख नेते अजित कासार व त्यांच्या पत्नी माजी जिल्हा परिषद सदस्या नम्रता कासार शुक्रवारी मुंबई येथील कामकाज आटपून मुरूडकडे येण्याचा प्रवास करीत होत्या. या घटनेमध्ये कासार दाम्पत्य सुखरुप बचावले आहेत.

याच बोटीमधून रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष व सागर कन्या मच्छिमार संघाचे चेअरमन मनोहर बैले व त्यांच्या पत्नी सुधा प्रवास करीत होते. अजंठा कॅटमरॉनमध्ये एकूण १३४ प्रवासी प्रवास करीत होते. वाऱ्याचा वेग जोरदार होता. बोट हळू हळू मध्यावर आली होती. नवीनच बोट बांधण्यात आली होती.त्यामुळे प्रवासी लोक आनंदात होते, परंतु जोरदार वाऱ्यामुळे लाटा उसळत होत्या. त्यातच बोटीला भोक पडल्यामुळे सर्वत्र गोधळ उडाला होता. हळूहळू बोट मधील पाठीमागचा भाग पाण्याखाली जाऊ लागला. त्यामुळे बोटी मधील महिला व लहान मुले रडू लागली व किंचाळी देऊ लागले. सर्वत्र वातावरण भय ग्रस्त झाले होते. बोटीचा मागचा भाग पाण्याखाली जाऊ लागल्याने सर्व प्रवासी बोटीच्या पुढील भागात येऊ लागले. सर्वांची गर्दी बोटीच्या पुढील भागात झाली. अजित कासार व मनोहर बैले यांनी लोकांना धीर देण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती अव्यक्याबाहेर जात आहे हे पाहताच बोटीच्या कॅप्टनने स्पीड बोट यांना पाचारण करून तातडीची मदत मागितली. कोणतीही वेळ न वाया जाऊ देता १२ बोटी तातडीने दुर्गटनग्रात बोटी जवळ येऊन सर्वांना सुखरूप किनाऱ्याला आणण्यात आले. हळूहळू अंधार होत होता, परंतु स्पीड बोट लवकरात लवकर असल्याने बोटीमधील सर्वच्या सर्व प्रवासी सुखरूप किनाऱ्याला पोहचले. नशीब बलवत्तर असल्याने वेळीच मदत धावून आली. उशीर झाला असता तर मोठी दुर्घटना झाली असती.

याबाबत अजीत कासार यांनी सांगितले की, बोट मध्य भागी आली असता खूप जोरात हालू लागली लटांचे पाणी बोटीच्या वरपर्यंत येऊ लागले. बोटी मधील महिला वर्ग रडत होत्या. लोक सायरावयरा पळू लागली आम्ही सर्वांना शांत राहण्यास सांगत होतो. सर्व प्रवाशी यांना लाईफ जॅकेट बांधण्यास सूचना देण्यात आल्या होत्या. बोट मागच्या बाजूने खाली जात असताना दिसत होती. मग कॅप्टनने स्पीड बोट मागविल्या. १० ते १२ बोट आमच्या चार हि बाजूने होत्या. मग हळू हळू बोट जेमतेम मांडवा जेटीला लागली सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. सर्व प्रवासी सुखरूप किनाऱ्याला पोहचले. अतिशय भयावह अनुभव असल्याचे कासार यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री शिंदेंनी घेतली धर्माधिकारी कुंटुंबियाची भेट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

त्याचे आगमन साळाव जेएसडब्लू कंपनीच्या हॅलीपॅडवर दुपारी पावणेदोनचे सुमारास झाले तेथून त्यांनी रेवदंडा येथे आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या निवासस्थानी प्रस्थान केले. या वेळी त्यांनी आप्पासाहेब धर्माधिकारी आणि कुंटूबियाची सदिच्छा भेट घेतली. यावेळी अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, जिल्हा प्रमुख राजा केणी, राष्ट्रवादी जिल्हा सचिव आशिष भट, उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण आदी शिवसेना कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

सायकांळी पाच वाजता उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तेथून परतीचा प्रवासास सुरूवात केली. या वेळी रेवदंडा पारनाका येथील श्री मारूतीरायाचे दर्शनाचा लाभ घेतला, येथेच राष्ट्रवादी काँग्रेसचे आशिष भट यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या यथोचीत सत्कार केला. त्यानंतर श्री मारूती मंदिराचे प्रांगणात एमएमआरडी अंतर्गत अलिबाग तालुक्यातील चौल व रामराज विभागातील जिल्हा परिषद गणातील १७० कोटी रूपयांच्या कामांचा शुभारंभ उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

यामध्ये चौल नाका ते वावे रस्ता, भोनंग फाटा ते तळवळी फाटा रस्ता, वावे नाका ते बेलोशी ते महाजने रस्ता, रेवदंडा येथे दोन भव्य कमान, रेवदंडा अंतर्गत दोन रस्ते, भंडारी समाज सभागृह, विठोबा आळी येथे सामाजीक सभागृह, रेवदंडा मच्छी मार्केट दुरूस्ती आदी कामाचा समावेश आहे.



# भातसई येथे भक्तीचा मेळा

## यात्रेनिमित्ताने गळ लावण्याचा थरार

**रोहे : प्रतिनिधी**

भातसई येथील महादेवी मातेच्या संपुर्ण मंदिर परिसरात नागरीकांची गर्दी होण्यास सुरुवात झाली. ४.३० वाजल्यापासुन गळ लावण्याचे ठिकाण सजण्यास सुरुवात झाले. ५.२५ सुमारास गळ लावण्याच्या ठिकाणी लाट बसविण्यात आले. पालखी मंदिरात घेण्यात आले. याच वेळी मंदिरात मानाच्या भक्तांना गळ टोचण्यात येत होते. सायंकाळी सगळ्यांचे लक्ष गळ लगण्याच्या ठिकाणाकडे लागले होते.

जस जसे वेळ जवळ येत होती. तस तसे नागरीकांची उत्सुकता वाढली होती. देवीची आरती घेण्यात आली. गळ टोचलेले भाविक गळ लावण्याच्या ठिकाणी ६.२० वाजताच्या सुमारास आले. सायंकाळी ६.४३ सुमारास मुख्य गळ असलेले महादेवीचे भक्त कृष्णा पांडुरंग रटाटे (धाटाव) यांना मुख्य गळ लावण्यात आले. लाटेवर अधांतरी गळ लावुन हर हर महादेवचा गजर होताच अधांतरी फिरवण्यात आले.

या वेळी त्यांच्या सोबत खालचा गळ यशवंत नारायण जोशी (भातसई), भगवान कृष्ण



शेळके (झोळांबे), संतोष रघुनाथ खरीवले (भातसई ), संजय दुर्गाजी शिंदे (झोळांबे), संदिप दत्तात्रेय चौलकर (लक्ष्मीनगर) यांना लावण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील नवसाला पावणारी महादेवी मातेच्या भाविकांचा व भक्तांचा मेळा शनिवारी महादेवी मातेच्या मंदिर परीसरात भरलेला पहावयास मिळाला. गळ लागण्या पुर्वी गावातील ग्रामस्थ महादेवीची पालखी टाळ खालुबाजु भजन करीत मंदिराच्या सभोवताली मिरवणुक काढली.

दोन दिवस संपुर्ण गाव सजले होते. सडा रांगोळी रंगरंगोटी पताका, विद्युतरोशनाईने गाव सजले होते. यात्रे निमित्ताने मंदिर परिसरात मिठाई, खेळणी, शितपेय, फुगे, अल्पोपहारचे दुकाने थाटली होती.



# डोंगराएवढे लक्ष्य पार करून हैदराबादचा विजयी ‘अभिषेक’




**हैदराबाद : वृत्तसंस्था**

अभिषेक शर्माच्या झंझावाती शतकाच्या बळावर सनरायझर्स हैदराबाद संघाने २४६ धावांचे डोंगराएवढे लक्ष्य सहज पार करून दाखवले. आयपीएलच्या इतिहासात धावांचा पाठलाग करतानाची ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. अभिषेकने पंजाबच्या गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवल्या.

अभिषेकने ५५ चेंडूत १४१ धावांची अविश्वसनीय खेळी साकारली. अभिषेक आणि ट्रॅव्हिस जोडीने १२.२ षटकात १७१ धावांची तडाखेबंद सलामी दिली. या भागीदारीनेच हैदराबादच्या विजयाचा पाया रचला. अभिषेकच्या खेळीने असंख्य विक्रम मोडीत निघून नवे रचले गेले. हैदराबादने आठ विकेट्स आणि नऊ चेंडू राखून हा सामना जिंकला.

२४६ धावांचे प्रचंड लक्ष्य समोर असताना अभिषेक आणि ट्रॅव्हिस जोडीने पहिल्या चेंडूपासून चौकार, षटकारांची बरसात केली. अभिषेकने सूत्रधाराची भूमिका स्वीकारत पंजाबच्या गोलंदाजांना निष्प्रभ ठरवले. वेगवान गोलंदाज असोत की फिरकीपटू अभिषेक फटके लगावत गेला, ते चौकार-षटकार होत गेले. हेडनेही हात धुवून घेत फटकेबाजी केली. १३व्या षटकात युझवेंद्र चहलला मोठा फटका खेळताना हेड बाद झाला. त्याने ३७ चेंडूत ६६ धावांची खेळी केली. हेड बाद झाल्यावर अभिषेकने आणखी आक्रमक पवित्रा स्वीकारत पंजाबला पुनरागमनाची संधी मिळणार नाही याची काळजी घेतली. ५५ चेंडूत १४ चौकार आणि १० षटकारांसह १४१ धावांची मॅरेथॉन खेळी साकारून अभिषेक परतला तेव्हा हैदराबादच्या विजयाची औपचारिकता बाकी उरली होती. आयपीएलच्या इतिहासात सर्वात जलद शतक करणारा अभिषेक सहावा, तर आयपीएल इतिहासात सर्वात मोठी धावसंख्या उभारणारा पहिला फलंदाज ठरला.

पंजाबचा प्रमुख गोलंदाज लॉकी फर्ग्युसन दुखापतीमुळे केवळ दोनच चेंडू टाकून ड्रेसिंगरुममध्ये परतला. दुखापतीचे स्वरूप गंभीर असल्याने लॉकी पुन्हा गोलंदाजीला आला नाही. पंजाबचा संघ फक्त दोन विकेट्स घेऊ शकला.

तत्पूर्वी पंजाब किंग्सने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि वादळी फलंदाजीसह २४६ धावांचा डोंगर उभारला. प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी संघाला वादळी सुरुवात करून दिली. संघाने पॉवरप्लेमध्येच ८० धावांचा पल्ला गाठला होता. प्रियांशने १३ चेंडूत ३६ धावांची खेळी केली, तर प्रभसिमरन २३ चेंडूत सात चौकार आणि एका षटकारासह ४२ धावा करू शकला.

यानंतर श्रेयस अय्यरने ३६ चेंडूत सहा चौकार आणि सहा षटकारांसह ८२ धावांची खेळी केली, तर नेहल वढेरा २७ धावा आणि स्टॉयनिसने ११ चेंडूत चार षटकार आणि एका चौकारासह ३४ धावा केल्या. अभिषेक शर्माला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

# पायोनियर प्रीमिअर लीगमध्ये पायोनियर पँथर्स संघ विजेता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील अभिनव युवक मित्र मंडळाच्या माध्यमातून विभागातील सर्व आजी-माजी क्रिकेटपटूंसाठी पायोनियर प्रीमिअर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या पायोनिअर पँथर्स संघाने प्रथम क्रमांक पटकावला.




हनुमान जयंतीचे औचित्य साधून सुकापूरच्या सॉकर सिटी येथे झालेल्या स्पर्धेत पायोनियर किंग (कर्णधार अल्पेश पाडावे), पायोनियर टायगर्स (कर्णधार मयुर चिटणीस), पायोनियर मराठा (कर्णधार शैलेश कदम) व पायोनियर पँथर्स (कर्णधार राजा चव्हाण) असे चार संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन माजी क्रिकेटपटू सुधीर देसाई व रायगड पत्रकार प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणात क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

सामने अटीतटीचे झाले. अनेक आजी माजी दिग्गज खेळाडूंनी यात सहभागी होऊन आपल्या खेळाची नजाकत दाखवली. अंतिम सामना पायोनियर मराठा व पायोनियर पँथर्स यांच्यात रंगला. अंतिम क्षणी पायोनियर पँथर्स निर्णायक संघाने विजय मिळवला.

विजेत्या संघाला मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील, रायगड प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम, माजी क्रिकेटपटू सुधीर देसाई, चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येईल; त्याचप्रमाणे महिलावर्गासाठीसुद्धा लवकरच अशा प्रकारची क्रिकेट स्पर्धा आयोजित करू, असे मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील यांनी या वेळी सांगितले.



# कबड्डी स्पर्धेत रासळ संघ विजेता

**पाली : प्रतिनिधी**

जय हनुमान क्रीडा मंडळ मजरे जांभूळपाडा या मंडळाच्या वतीने रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन व सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने ४१व्या क्रीडा महोत्सवानिमित्त तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन नुजतेच करण्यात आले होते. या स्पर्धेतील जय हनुमान रासळ संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत तालुक्यातील ३२ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम लढत रासळ विरुद्ध हनुमान चिवे या संघात झाली. तृतीय क्रमांक कालभैरव भार्जे, तर चतुर्थ क्रमांक श्री वरदायनी राबगाव संघाने मिळविला. विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू साहिल जगताप (रासळ), उत्कृष्ट चढाईपटू सुमित ठाकूर (चिवे), उत्कृष्ट पकडपटू शुभम शिंदे (भार्जे), पब्लिक हिरो अजिंक्य मोरे (राबगाव) या खेळाडूंना आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

सुप्रिमो चषक क्रिकेट स्पर्धा

# अखिलच्या भेदक गोलंदाजीमुळे कर्नाटकचा हॉस्पेट संघ उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

टेनिसमधील वर्ल्डकप समजल्या जाणाऱ्या सुप्रिमो चषक क्रिकेट स्पर्धेचा तिसरा दिवस गाजवला तो श्रीलंकन गोलंदाज अखिलने. त्याच्या जादुई स्पेलमुळे कर्नाटकच्या एफ.एम. हॉस्पेट संघाने केरळच्या सुल्तान ब्रदर्स पायरट्सचा आठ विकेट राखून पराभव करीत उपांत्य फेरीत धडक दिली.

सांताक्रुझच्या एअर इंडिया मैदानावर श्रीलंकन स्टार बॉलर अखिलने उपांत्य पूर्व फेरीत एक निर्धाव षटक टाकतानाच अवघ्या चार धावांमध्ये दोन विकेट्स घेतल्यामुळे केरळच्या सुल्तान ब्रदर्स पायरट्स संघाला आठ षटकांमध्ये आठ विकेट्च्या मोबदल्यात ५६ धावा करता आल्या. कर्नाटकच्या हॉस्पेट संघाने हे आव्हान लीलया पेलत दीड षटक आणि आठ विकेट्स शिल्लक ठेवून शानदार विजय मिळवित दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला.

हॉस्पेटतर्फे प्रथमेश पवारने ११ चेंडूत २० धावा केल्या. हॉस्पेटच्या विजयाचा शिल्पकार ठरलेल्या श्रीलंकेच्या अखिलला सामनावीर किताबाने गौरविण्यात आले. हॉस्पेटसोबत आता पुण्याच्या डिंगडॉग आणि मुंबईच्या बालाजी क्लबने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली आहे.






# भालाफेकपटू डीपी मनूवर चार वर्षांची बंदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा भालाफेकपटू आणि आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक विजेता डीपी मनू डोपिंग प्रकरणात दोषी आढळल्यामुळे त्याच्यावर चार वर्षांची बंदी घालण्यात आली आहे.

२५ वर्षीय मनूने २०२३मधील आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते तसेच बुडापेस्ट वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये सहावे स्थान मिळवले होते, तर एप्रिल २०२४मध्ये बंगळुरू येथे आयोजित इंडियन ग्रां प्री-१मध्ये त्याने ८१.९१ मीटर भालाफेक करत स्पर्धा जिंकली होती. याच स्पर्धेदरम्यान घेतलेल्या नमुन्यांमध्ये डोपिंगची पुष्टी झाली. त्याच्या चार वर्षांच्या निलंबनाचा कालावधी २४ जूनपासून लागू असेल. डोपिंग चाचणीत अपयशी ठरल्यामुळे मनूचे ऑलिम्पिकमध्ये जाण्याचे स्वप्न भंगले आहे.






# लखनऊने रोखला गुजरातचा विजयरथ

**लखनऊ : वृत्तसंस्था**


लखनऊ सुपर जायंट्सने गुजरात टायटन्सला नमवत त्यांचा विजयरथ रोखला आहे. आयुष बडोनीचा अखेरच्या षटकातील चौकार आणि षटकारासह लखनऊने सहा विकेट्सने शानदान विजय नोंदवला. लखनऊकडून एडन मारक्रम आणि निकोसल पुरन यांनी अर्धशतके झळकावली.

लखनऊ संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. गुजरात संघाने प्रथम फलंदाजी करताना गिल-सुदर्शनच्या जोडीने १२० धावांची भागीदारी केली, पण त्यानंतर लखनऊच्या गोलंदाजांनी पुनरागमन करत गुजरातला १८० धावांवर रोखले.










ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

वर्ष २० वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ।। ज्ञान होय मूढा । अती मूर्ख त्या दगडा ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत
माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

अखंड हरिनाम सप्ताह
ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

दैनंदिन कार्यक्रम

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.

व्यासपीठ चालक : ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.३० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०८.०० ते १०.०० वा. - कीर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | कीर्तन (रात्री ८ ते १०) |
|---|---|---|
| **सोमवार** (दि. १४/०४/२०२५) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | ह.भ.प. श्री. भगिरथ महाराज काळे (सिन्नर) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **मंगळवार** (दि. १५/०४/२०२५) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| **बुधवार** (दि. १६/०४/२०२५) | सकाळी ८.३० वा. - ग्रंथराज ज्ञानेशरी पुजन सायं.४ ते ५ वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. गाथामूर्ती देवेंद्र महाराज निढाळकर (आळंदी देवाची) सौजन्य : सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |

काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com